दैनिक राज्य लोकतंत्र
www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com
बीड – महाराष्ट्र | वर्ष – ४ | अंक–८ | गुरूवार दि.१८ एप्रिल २०२४ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | • पाने– ६ | किंमत ३ रूपये

संपादकीय

रॅगिंग चे दुष्टचक्र थांबण्याची गरज

राज्यात पुन्हा एकदा रॅगिंगची घटना उघडकीस आली आहे. पुण्यातील बी.जे. वैद्यकीय महाविद्यालयात प्रथम वर्षात शिकणाऱ्या दोन विद्यार्थिनींवर रॅगिंग झाल्याचे वृत्त माध्यमात प्रसिद्ध झाले आहे. रॅगिंग विरोधी अनेक कायदे आहेत. दोषींना कडक शिक्षेची तरतूद आहे. तरीही अशा घटना अधूनमधून घडतात. अनेक सामाजिक समस्यांवर सरकार कायदे करते. कायदे आवश्यक असतात पण फक्त कायद्याच्या आधारे प्रश्न सुटत नाहीत. अन्यथा रॅगिंगच्या घटनांना आळा बसू शकला असता.

लक्षवेधी जागांवर आज उमेदवारी अर्ज भरले जाणार

पुणे: विदर्भातील पाच जागांसाठी प्रचार तोफा बुधवारी थंडावल्यानंतर आता महाराष्ट्रामध्ये सर्वाधिक लक्ष लागून राहिलेल्या पश्चिम महाराष्ट्रामध्ये निवडणुकीची रणधुमाळी प्रत्यक्षात सुरु होणार आहे. गुरूवारी (१८ एप्रिल) महायुतीकडून जोरदार शक्तीप्रदर्शन करत राज्यातील सर्वाधिक हाय व्होल्टेज असलेल्या आणि पवार विरुद्ध पवार असा थेट सामना रंगलेल्या बारामती, महाविकास आघाडीमध्ये झालेल्या बंडाळीमुळे सर्वाधिक लक्षवेधी ठरलेल्या सांगली आणि उमेदवारी निश्चित असून सुद्धा गेल्या अनेक दिवसांपासून उमेदवारी जाहीर होण्याच्या प्रतीक्षेमध्ये राहिलेल्या सातारा लोकसभेसाठी उमेदवारी अर्ज दाखल केले जाणार आहेत.

दुष्काळाच्या झळा तिव्र झाल्या, जनावरांचे हाल वाढले

राज्यातील दोन हजारहून अधिक गावांना टँकरद्वारे पाणी; सरकार, पुढारी मात्र प्रचारात व्यस्त

पुणे । प्रतिनिधी

राज्यात मागच्या वर्षी पाऊस झाला नसल्याने यंदा दुष्काळाची स्थिती निर्माण झाली आहे. आता दुष्काळाच्या तिव्र झळा बसायला सुरूवात झाली असून, राज्यातील धरणांमध्ये पाणीसाठी कमी असल्याने मार्चच्या सुरुवातीपासूनच अनेक जिल्ह्यांत टँकरद्वारे पाणी देण्याची वेळ आली आहे. तर शेती पिकासाठी पाणी नसल्याने राज्यातील शेतीचे उत्पादनही घटणार आहे. सद्य परिस्थितीत जनावरांचे चारा पाण्या वाचून हाल होऊ लागले असल्याने शेतकरी हतबल झाले आहेत तर दुसरीकडे सरकार आणि पुढारी लोकसभेच्या प्रचारात व्यस्त असल्याचे दिसत आहे.

राज्यात सध्या १,८३७ हून अधिक गावे आणि ४ हजार ३१८ वाड्यांवर पाणीटंचाईचे भीषण संकट ओढवले आहे. ग्रामस्थांसह जनावरांना पिण्याच्या पाण्याचे दुर्भिक्ष निर्माण झाले आहे. यंदा पावसाने हुलकावणी दिल्याने मागील वर्षीच्या तुलनेत टँकरच्या संख्येत तब्बल २८ पटींनी वाढ झाली आहे मात्र तरी दुष्काळग्रस्त भागात पाण्याचे नियोजन करण्यास सरकारला वेळ मिळालेला नाही.

विदर्भ– मराठवाड्यात पशूधनावर संकट

विदर्भ आणि मराठवाड्यात जनावरांच्या चारा आणि पाण्याचे गंभीर संकट उभे ठाकले आहे. यामुळे पशू पालक प्रचंड अडचणीत सापडले असून, मायबाप सरकार दखल घेताना दिसत नाही. याचा परिणाम म्हणून जनावरे विक्रीसाठी बाजारात आणली जात आहेत. दुभत्या जनावरांसह शेतीकामासाठी आवश्यक असलेल्या बैलांचे दरही झपाट्याने उतरले आहेत.

राज्यातल्या धरणांमधील पाणीसाठा ३३.३८ टक्क्यांवर आला आहे. मागील वर्षीच्या तुलनेत टँकरच्या पाण्याची मागणी २८ टक्क्यांनी वाढली आहे. राज्य सरकारने ४० तालुके आणि १,१०० हून अधिक मंडलांत दुष्काळ जाहीर केला. मात्र पाण्याची सोय करण्यात सरकारला अपयश आले आहे. सध्या १,८३७ गावे आणि ४,३१८ वाड्यांवर तीन हजार टँकरद्वारे पाणीपुरवठा केला जात आहे.

पंकजाताई मुंडेंचा आजपासून जाहीर सभांचा धडाका

आष्टी, पाटोदा, शिरूर मतदारसंघात चार सभा ; जाटनांदूर, उंदरखेल, आष्टी व मुगगावात तोफ धडाडणार

बीड । प्रतिनिधी

भाजपा महायुतीच्या उमेदवार पंकजाताई मुंडे यांच्या प्रचाराचा तिसरा टप्पा जाहीर सभांच्या माध्यमातून उद्या (ता. १८) पासून सुरू होत आहे. आष्टी– पाटोदा मतदारसंघातील जाटनांदूर, उंदरखेल, आष्टी व मुगगाव येथे त्यांच्या जाहीर सभा होणार असून मतदारसंघातील विविध गावांचा दौराही त्या करणार आहेत.

पंकजाताईंना प्रचंड मताधिक्य मिळवून देण्यासाठी भाजपसह महायुतीच्या घटक पक्षाचे सर्व पदाधिकारी कामाला लागले असून गावोगावच्या कार्यकर्त्यांमध्ये नवचैतन्य निर्माण झाले आहे. उद्या १८ एप्रिल रोजी सकाळी ८.४५ वाजता पंकजाताई जाटनांदूर (ता.शिरूर कासार) येथे पहिली सभा घेणार असून त्यानंतर सकाळी १० वाजता उंदरखेल ता.आष्टी येथे सभा होणार आहे. सभेनंतर पंकजाताई मुंडे दुपारी १२ ते संध्याकाळी ४.३० वाजेपर्यंत दादेगाव, देवळाली, श्रीक्षेत्र मच्छिंद्रनाथ गड, सावरगाव मायंबा या ठिकाणी भेटी देत मतदारांची संवाद साधणार आहेत. सायंकाळी पाच वाजता आष्टी शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकात जाहीर सभा संपन्न होईल. या सभेला आष्टी शहरासह मतदारसंघातील पदाधिकारी कार्यकर्त्यांसह मतदार उपस्थित राहणार आहेत. आष्टीची सभा आटोपून त्या सायंकाळी ६.३० ते ७.१५ दरम्यान तालुक्यातील पोखरी, पांढरी व ब्रह्मगाव येथे त्या भेटी देतील. नंतर सायंकाळी ७.३० वाजता मुगगाव ता.पाटोदा येथे त्या जाहीर सभेस संबोधित करतील.या सभांना मोठया संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन महायुतीच्या वतीने करण्यात आले आहे.

वीज पडून चार जनावरांचा मृत्यू

शेतकऱ्याचे लाखों रुपयाचे नुकसान

बीड । प्रतिनिधी

बीड तालुक्यातील पांढरवाडी शिवारात बुधवार दि. १७ रोजी सायंकाळी पाच च्या सुमारास विजांच्या कडकडाटासह अवकाळी पावसाला सुरूवात झाली. या दरम्यान वीज पडून चार जनावरांचा जागीच मृत्यू झाला. यामुळे शेतकऱ्याचे लाखो रूपयाचे नुकसान झाले आहे.

पांढरवाडी येथील शेतकरी दिलीप उत्तम शेळके यांनी आपली ◀◀ पान २ वर

देशभक्ती आम्हाला शिकवू नका – प्रियंका गांधी

सहारनपूर । वृतसंस्था

'मोदीजींनी हमी दिली होती की, प्रत्येकाच्या खात्यात १५ लाख रुपये येतील. आलेत का? २ कोटी नोकऱ्या देणार, असे पंतप्रधान मोदी म्हणाले होते, ते मिळाले का? देशभक्ती म्हणजे काय हे सरकारने आम्हाला शिकवू नये, आमच्या कुटुंबातील लोक शहीद झाले आहेत. आणि खरा धर्म काय आहे, हे आम्हाला चांगले माहीत आहे, असे प्रियंका गांधी म्हणाल्या.

प्रियंका गांधी यांनी बुधवारी (दि.१७) युपीतील सहारनपूर येथे रोड शो केला. यावेळी त्यांनी केंद्र सरकारवर जोरदार हल्ला चढवला. प्रियंका गांधी म्हणाल्या की, आम्ही सत्तेची पूजा करत नाही, तर

शक्ती आणि सत्याची पूजा करतो. आज जे सत्तेत आहेत ते सत्याची नाही, तर सत्तेचे पूजक आहेत. खरा राम भक्त तोच असतो, जो सत्याच्या मार्गावर चालतो, मग तो कोणत्याही धर्माचा असो. पंतप्रधान मोदी यांनी इंदिरा गांधी यांच्याबद्दल बोलू नये, आम्हाला माहीत आहे की, त्यांचा धर्म कोणता होता. या देशाचा देशभक्तीचा धर्म आहे. देशासाठी ◀◀ पान २ वर

कंगनावर हल्लाबोल...

हिमाचल प्रदेशच्या मंडीमधून अभिनेत्री कंगना रणौत भाजपकडून लोकसभा निवडणूक लढवत आहेत. कंगनाने प्रचारादरम्यान काँग्रेस नेत्या सोनिया गांधी यांच्यावर टीका केली होती. या टीकेला काँग्रेस सरचिटणीस प्रियंका गांधी यांनी प्रत्युत्तर दिले आहे. कंगना आमच्याबद्दल बोलत आहे, याबद्दल आम्ही खूप आभारी आहोत. पण मी तिच्या मूर्खपणावर उत्तर द्यावे, असे तुम्हाला वाटते का?, असा सवाल करून माझे वडील जिवंत असतानाही सोनिया गांधींना शिवीगाळ केली जात होती, असे त्या म्हणाल्या.

विदर्भातील काही जिल्ह्यांत उद्या मतदान

मुंबई । प्रतिनिधी

देशात सध्या १८ व्या सार्वत्रिक निवडणुकीची रणधुमाळी सुरू आहे. सत्ताधारी आणि विरोधी पक्ष आपापल्या उमेदवारांच्या प्रचारात व्यस्त असून, आमच्या उमेदवारांनाच निवडून द्या, असे आवाहन मतदारांना करत आहेत. दरम्यान, देशातील आणि राज्यातील पहिल्या टप्प्याच्या निवडणूक प्रचारांच्या तोफा बुधवारी थंडावल्या आहेत. कारण पहिल्या टप्प्याचे मतदान १९ एप्रिल रोजी पार पडणार आहे. शुक्रवारी पहिल्या टप्प्यात महाराष्ट्रातील नागपूर, रामटेक, भंडारा–गोंदिया, गडचिरोली, चंद्रपूर या मतदारसंघांत मतदान होणार आहे.

नागपूर: एके काळी काँग्रेसचा गड असलेल्या नागपूर मतदारसंघात सध्या भाजपचे वर्चस्व आहे. भाजपने येथून विद्यमान केंद्रीय मंत्री भाजपचे माजी अध्यक्ष नितीन गडकरी यांना उमेदवारी दिली आहे. तर काँग्रेसने विकास ठाकरे यांना उमेदवारी दिली आहे. तर वंचितचे प्रकाश आंबेडकर यांनी येथून आपला उमेदवार न देता काँग्रेसला पाठिंबा दिला आहे. बसपानेही आपला उमेदवार उभा केला असला तरी मुख्य लढत भाजप आणि ◀◀ पान २ वर

दारु पिण्यासाठी पैसे न दिल्याने लहान भावाने केला मोठ्या भावाचा खून

माजलगाव शहरातील फुले नगर येथील घटना

माजलगाव । प्रतिनिधी

शहरातील फुलेनगर मध्ये लहान भावाने मोठ्या भावाकडे दारु पिण्यासाठी पैसे मागितले असता, मोठ्या भावाने पैसे न दिल्याच्या रागातुन लहान भावाने मोठ्या भावाच्या डोक्यात व हातावर कशाने तरी गंभीर मारहाण करून खून केल्याची घटना दि.१६ एप्रिल मंगळवार रोजी सायंकाळी ६:०० ते ६:३० दरम्यान घडली. याप्रकरणी माजलगाव शहर पोलीस ठाण्यात

खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

यासंदर्भात पोलिस सुत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार माजलगाव शहरातील फुलेनगर मध्ये आरोपी उमेश अशोकराव सोळंके (३२) याने त्याचा मोठा भाऊ मयत गणेश अशोकराव सोळंके (३५) याच्याकडे दारु पिण्यासाठी पैसे मागितले. मयत गणेश सोळंके यांने आरोपी उमेश सोळंके यास दारु पिण्यासाठी पैसे न दिल्याने, उमेश सोळंके याने गणेश यास कुठल्यातरी हत्याराने डोक्यात व हाताला गंभीर मारहाण करुन जिवे मारले. मयताचा तीन नंबरचा भाऊ महेश अशोकराव सोळंके (३०) याने माजलगाव शहर पोलीस ठाण्यात फिर्यादी ◀◀ पान २ वर

ट्रॅक्टर उलटून परळीत भीषण अपघात; दोन कामगारांचा मृत्यू

बीड । प्रतिनिधी

विद्युतवाहिनीसाठीचे सिमेंट पोल घेऊन जाणारे ट्रॅक्टर धर्मापुरी रस्त्यावर मंगळवारी रात्री उलटले. या दुर्घटनेमध्ये ट्रॅक्टरमधील सिमेंट पोल अंगावर पडल्याने त्याखाली दबून भोजनकवाडी येथील दोन कंत्राटी कामगारांचा जागीच मृत्यू झाला. प्रल्हाद वैजनाथ फड व भाऊसाहेब माणिक केदार (दोघे राहणार भोजनकवाडी) अशी मृत्यू पावलेल्या कामगारांची नावे आहेत.

मंगळवारी रात्री धर्मापुरी येथून पाच मजूर एका ट्रॅक्टरमधून विद्युतवाहिनीसाठीचे सिमेंटचे पोल घेऊन भोजनकवाडीकडे जात होते. धर्मापुरी रस्त्यावरील कॉलेजजवळील उतारावर अचानक ट्रॅक्टर उलटला. काही कळायच्या आत ट्रॅक्टरमधील मजुरांच्या अंगावर सिमेंटचे पोल पडले. अवजड पोलखाली दबल्याने दोघांचा जागीच मृत्यू झाला. तर तिघे गंभीर जखमी झाले. अपघाताची माहिती मिळताच परळी ग्रामीणचे पोलिस निरीक्षक मनीष पाटील, एपीआय जाधव, नवनाथ हरगावकर, सुनील अन्नमवार यांनी अपघातस्थळी भेट देऊन मदत कार्य केले. तिन्ही जखमींना अंबाजोगाईच्या स्वामी रामानंद तीर्थ शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. दरम्यान, अपघातानंतर ट्रॅक्टरचालकाने घटनास्थळावरून पळ काढला. दोन तरुणांचा अपघाती मृत्यू झाल्याने भोजनकवाडीमध्ये शोककळा पसरली आहे.

बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड,दि.१६ एप्रिल २०२३

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

	किमान	कमाल	सरासरी
गहू : ३२.५० क्विंटल			
	२,३२१	३,२२१	२,८६०
ज्वारी/हायब्रिड : १९२.०० क्विंटल			
	१,८००	३,६५१	२,७०३
मूग : ०.५० क्विंटल			
	९,८५०	९,८५०	९,८५०
तूर : १४.०० क्विंटल			
	३,७०१	१०,६००	९,०३०
उडीद : १.५० क्विंटल			
	५,०००	६,५०१	५,७५०
बाजरी: १६.०० क्विंटल			
	२,३१०	२,६१३	२,४६१
चिंचोका/लोकल: ८.०० क्विंटल			
	२,४००	२,४००	२,४००
सोयाबीन: २१४.०० क्विंटल			
	४,३३०	४,७११	४,६५२
हरभरा: १.५० क्विंटल			
	५,५५०	५,६००	५,५७५

२००९ मध्ये मुंडे साहेब तर आज बजरंग सोनवणे एकटे पडले!

पंकजा मुंडेंकडे डझनभर तर महाविकास आघाडीकडे मोजकेच नेते!

बीड । प्रतिनिधी

राजकारणात कधी काय होईल हे सांगता येत येत नाही. ज्यांना ज्यांना आमदार, जिल्हा परिषदेचे अध्यक्ष, उपाध्यक्ष केले असे सर्वच स्व. गोपीनाथ मुंडे यांना २००९ च्या लोकसभा निवडणुकीत सोडून राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये गेले होते. त्यावेळी काही मोजक्या शिलेदारांना सोबत घेऊन त्यांनी किल्ला लढविला व जिंकलाही. त्यानंतर तब्बल १५ वर्षाने बीड जिल्ह्याच्या राजकारणात त्याच स्थितीची पुनरावृत्ती झाली असून भाजप उमेदवार पंकजा मुंडे यांच्याकडे डझनभरापेक्षा जास्त तर महाविकास आघाडीचे उमेदवार बजरंग सोनवणे यांच्यासोबत बोटावर मोजण्याऐवढे नेते आहेत. त्यावेळी मुंडे साहेबांना जे जमले ते सोनवणे यांना जमणार की नाही याविषयी सर्वांना उत्सुकता आहे.

महाराष्ट्राच्या राजकारणात चांगल्यापैकी स्थिरावल्यानंतर बीडमधून पहिल्यांदा गोपीनाथ मुंडे हे लोकसभा निवडणुकीस उभे राहिले. त्यावेळी मुंडे यांनीच ज्यांना ज्यांना आमदार व इतर पदे दिली. त्यांनीच ऐन निवडणुकीच्या तोंडावर त्यांची साथ सोडत बारामती जवळ केली. आ. सुरेश धस, माजी आ. अमरसिंह पंडीत, आ. प्रकाश सोळंके, भीमराव धोंडे, साहेबराव दरेकर, जयदत्त क्षीरसागर, सुरेश नवले, नंदकिशोर मुंदडा, बदामराव पंडीत ही सर्व दिग्गज त्यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे उमेदवार रमेश आडसकर यांच्या व्यासपीठावर होते. तर गोपीनाथ मुंडे यांच्यासोबत धनंजय मुंडे, पंकजा मुंडे यांच्यासह आष्टीत बाळासाहेब आजबे, गेवराईत लक्ष्मण पवार, माजलगावात माजी आ. राधाकृष्ण होके पाटील, मोहनराव सोळंके, बीडमध्ये आदिनाथ नवले, रमेश पोकळे हे चेहरे पुढे आले. त्यावेळी एकीकडे दिग्गजांची फौज तर दुसरीकडे मुंडे साहेबांच्या व्यासपीठावर नवख्यांसह जेष्ठांची हजेरी होती.

◀◀ पान २ वर

रमेश पोकळेंनी एकट्यानेच लढला किल्ला

२००९ च्या निवडणुकीत मुंडे साहेबांच्या नंतर सभा गाजवणाऱ्यांमध्ये रमेश पोकळे हे एक नाव होते. मुंडे साहेबांचे विश्वासू म्हणून त्यांची ओळख होती. अभ्यासू बाणा आणि विषयाची पध्दतशीर मांडणी यामुळे पोकळे यांचे भाषण खास आकर्षण ठरले. सध्या पोकळे हे राजकारणापासून दोन हात दुर आहेत.

"बजरंग बप्पासाठी हे चेहरे

खा. रजनी पाटील, आ. संदिप क्षीरसागर, माजी आ. पृथ्वीराज साठे, राधाकृष्ण पाटील, साहेबराव दरेकर, सय्यद सलिम, बदामराव पंडीत, बबन गिते, शिवसेना जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते, गणेश वरेकर

"पंकजाताईसाठी ही फौज

पंकजा मुंडे यांच्या विजयासाठी पालकमंत्री धनंजय मुंडे, खा. प्रितमताई मुंडे, आ. सुरेश धस, आ. नमिता मुंदडा, आ. बाळासाहेब आजबे, आ. लक्ष्मण पवार, आ. प्रकाश सोळंके, भीमराव धोंडे, अमरसिंह पंडीत, शिंदे शिवसेनेचे जिल्हाप्रमुख अनिल जगताप, सचिन मुळूक, कुंडलिक खांडे, डॉ. योगेश क्षीरसागर, रमेश आडसकर, मोहन जगताप

अग्रलेख

रॅगिंग चे दुष्टचक्र थांबण्याची गरज

राज्यात पुन्हा एकदा रॅगिंगची घटना उघडकीस आली आहे. पुण्यातील बी.जे. वैद्यकीय महाविद्यालयात प्रथम वर्षात शिकणाऱ्या दोन विद्यार्थिनींवर रॅगिंग झाल्याचे वृत्त माध्यमात प्रसिद्ध झाले आहे. रॅगिंग विरोधी अनेक कायदे आहेत. दोषींना कडक शिक्षेची तरतूद आहे. तरीही अशा घटना अधूनमधून घडतात. अनेक सामाजिक समस्यांवर सरकार कायदे करते. कायदे आवश्यक असतात पण फक्त कायद्याच्या आधारे प्रश्न सुटत नाहीत. अन्यथा रॅगिंगच्या घटनांना आळा बसू शकला असता.

रॅगिंग होणाऱ्या मुलांच्या मनावर त्याचे खोल दुष्परिणाम संभवतात. जे करतात त्यांच्याही बाबतीत असे घडण्याचा धोका नाकारला जाऊ शकत नाही. दोषींना शासन व्हायला हवे. तथापि या समस्येचा बहुआयामी विचार केला जायला हवा. रॅगिंग सहन करणारी किती मुले तक्रार नोंदवतात? सहन करण्याकडेच बहुसंख्यांचा कल का आढळतो? शिकायचे तर त्याच संस्थेत आहे, मग कशाला वितुष्ट पत्करायचे? तक्रार केली तर भविष्यात कठोर रॅगिंगला सामोरे जावे लागू शकेल का अशी भीती अनेक मुलांना वाटत असते. अनेक पालकांनी त्यांच्या मुलांच्या शिक्षणासाठी कर्ज काढलेले आढळते. काही पालक त्यांच्या आयुष्याची पुंजी उपयोगात आणतात. रॅगिंग झाल्याचे पालकांना कळाले तर ते मानसिकरित्या खचून जाण्याची भीती देखील अनेकांना सतावत असू शकेल. मुलांच्या आणि त्यांच्या पालकांच्या मनात कायद्याचा विश्वास निर्माण करण्यात सरकारे अपयशी ठरतात असाही याचा अर्थ काढला जाता येऊ शकतो.

मुलांची मानसिकता घडवण्यात पालकांचाही मोठा वाटा असतो. अनेक घरांमध्ये मुले वयाने मोठी झाल्याचे त्यांच्या पालकांना मान्य नसते. तरुण वयात देखील त्यांनी प्रत्येक गोष्ट पालकांना विचारून करावी अशीच पालकांची अपेक्षा असल्याचे दिसते. अशा मानसिकतेची काही मुले रॅगिंग करून त्यांचे श्रेष्ठत्व प्रस्थापित करू पाहत असू शकतील का? त्यांचे म्हणणे किंवा आज्ञा विनाशर्त कोणीतरी पाळते अशी भावना त्यांना रॅगिंग करायला प्रवृत्त करत असेल कदाचित. समस्येच्या मुळाशी जाण्यासाठी जाणते मार्गदर्शन करू शकतील. महाविद्यालयांमध्ये सातत्याने अशा मुद्यांवर संवाद, सत्रे आयोजित केली जाऊ शकतील. कोणत्याही भीतीविना विद्यार्थी त्यांचे मन मोकळे करू शकतील अशी व्यवस्था असणे गरजेचे आहे. अशा मुलांची ओळख जाहीर केली जाणार नाही, असा विश्वास निर्माण केला गेला तर अनेक विद्यार्थी कदाचित पुढे येऊ शकतील. तसे झाले तर रॅगिंगसारखी कोणतीही घटना घडण्याआधी थांबवली जाऊ शकेल.

प्रभु श्रीराम भारतीय समाज व्यवस्थेच्या संस्काराचा गाभा आहे-महंत लक्ष्मण महाराज मेंगडे

बंकटस्वामी महाराजांनी भगवान बाबा, वामन भाऊ सारखे हिरे घडवले हे अलौकिक कार्य-खा.प्रीतम मुंडे

नेकनूर । प्रतिनिधी

श्रीक्षेत्र नेकनूर येथील राम मंदिरात मर्यादा पुरुषोत्तम प्रभू श्रीरामचंद्र यांचाजन्मोत्सव सोहळा व संत वै सुदामदेव महाराज यांच्या पुण्यतिथी उत्सवाची महंत लक्ष्मण महाराज मेंगडे यांच्या काल्याच्या कीर्तनांने आज थाटात सांगत झाली. यावेळी हजारो भाविक भक्तांच्या उपस्थितीत श्रीराम जन्मोत्सव पारंपारिक पद्धतीने भजन कीर्तनाच्या जयघोषात साजरा करण्यात आला.. प्रभू रामचंद्राच्या घोषणांनी परिसर दुमदुमून निघाला..यावेळी प्रमुख उपस्थिती खा डॉ प्रितमताई मुंडे, श्री ह भ.प हरिहर भारती महाराज,श्री ह भ प नवनाथ महाराज जरुडकर,ह भ प महंत तुकाराम महाराज भारती,श्री ह भ प सत्यवान महाराज लाटे, सुरेश महाराज जाधव , दिनेशानंद महाराज काळे, श्रीकृष्ण महाराज यादव,विश्वनाथ अप्पा कपिलधार, अच्युत महाराज घोडके, महंत आदिकनाथ महाराज, यांच्या सह बंकटस्वामी संस्थानचे सर्व विश्वस्त व हजारों भविक भक्ताची उपस्थिती होती

बीड तालक्यातील श्रीक्षेत्र नेकनुर येथे श्रीराम मंदीरात संत सुदामदेव महाराज यांच्या २२ व्या पुण्यतिथी उत्सवाची बुधवारी काल्याच्या कीर्तनाने थाटात सांगता झाली. महंत लक्ष्मण महाराज मेंगडे यांनी संत तुकाराम महाराज यांच्या

विश्वाचा जनिता ।
म्हणे यशोदेसि माता ।।१।।
ऐसा भक्तांचा अंकित ।
लागे तैसी लावी प्रीत ।।ध्रु.।।
निष्काम निराळा ।
गोपी लावियेल्या चाळा ।।२।।

तुका म्हणे आलें ।
रूपा अव्यक्त चांगलें ।।३

प्रभू राम हा भारतीय संस्कृतीचा अविभाज्य घटक आहे. त्यांचे आदर्श तत्व आजही इथला समाज व्यवस्थेला दिशा दाखवतात,असे महाराजांनी सांगितले. भगवंताच्या दहा अवतार पैकी राम आणि कृष्ण अवतार पूर्ण आहेत , श्रीराम अवतारातिल चरित्र आचरणात आणावे.तर कृष्ण अवतारातिल चरित्र फक्त उच्चार करावा असेही सांगितले ,दोघांची भक्ति करतांना शुध्द अंतकरण आणि नामस्मरनातू देवाची सोपी भक्ति करावी असा संदेश दिला. संत सुदामदेव महाराज यांच्या पुण्यतिथी निमित्त बोलतांना बाबांचे आयुष्य हे त्यागी होते ,गुरु सेवेत सर्वस्व अर्पण करणारे इच्छा मरणी साधु आपल्याला लाभले हे भाग्य आहे ,गौर गरीब जनतेच्या दुःख मुक्ती साठी आणि आत्म उधारासाठी बाबानी संपूर्ण आयुष्य समर्पित केले ,प्रेमळ अंतकरणाचा दयाळू साधु असे सुदामदेव महाराज होते. त्यांच्या नंतर परमार्थ चालवताना पदों पदी आठवण येते.तसेच वै.रामहरी बाबा यांची आठवण कायम स्मरणात राहील.असे मेंगडे महाराज यांनी सांगितले ,सामाजिक बदलाची नांदी शिक्षनाचे महत्व ,व्यसन मुक्ती शेतकरी आत्महत्या आदि विषयावर प्रबोधन केले. यावेळी बंकटस्वामी महाराज फडावरील सर्व टाळकरी उपस्थित होते. शेवटी काल्याचां अभंग म्हणून दही हंडी पोडुन माहाप्रसाद वाटप करण्यात आला ,हजारोच्या पंगतीत मध्ये बूंदी आणि लाही चिवडयाचा माहाप्रसाद वाटप केला गेला संत बंकट स्वामी महाराज यांनी सर्व जाती धर्माच्या शिष्यांना वारकरी संप्रदायाचे तत्त्वज्ञान दिले.. आज त्याच पद्धतीने सर्व जाती-धर्मांनी देश बाजूला ठेवून समाजकारण राजकारण करणे गरजेचे आहे.. संत भगवान बाबा वामन भाऊ यांच्यासारखे हिरे बंकट स्वामी महाराजांनी घडवले हे अलौकिक कार्य आहे असं खा.प्रीतम मुंडे म्हणाल्या महाप्रसाद १५ पोते साखर ,१२ पोते दाल तर तेल २ टाकी आणि मूरमूरे ५० पोते होते यामुळे हजारो भाविक भक्तगण प्रसाद घेवुन तृप्त झाले.१००० जार च्या थंडगार पाण्याची व्यवस्था केली होती.

पान १वरून...

देशभक्ती आम्हाला शिकवू

शहीद होणे, हा त्यांचा धर्म होता. इंदिरा हिंदू धर्म मानत होत्या, आम्ही मानतो, काँग्रेस पक्ष मानतो आणि महात्मा गांधी मानत होते. त्या धर्माच्या आधारे आमचे आंदोलन सुरू आहे, तो सत्याचा धर्म आहे, अशा त्या म्हणाल्या.

वीज पडून चार

जनावरे शेताच्या बांधावर बांधली होती. बुधवारी सायंकाळच्या सुमारास अचानक पाऊस आल्याने ते जनावरांना गोठ्यात घेऊन जाण्याच्या तयारीत होते. मात्र, त्याचवेळी मोठा गडगडाट होऊन जनावरांच्या अंगावर वीज पडली. यामध्ये दोन बैल, दोन दुभत्या गायींचा मृत्यू झाला. शेतकरी दिलीप शेळके यांचे यात सुमारे तीन लाख रूपयांचे नुकसान झाल्याचे सांगण्यात येत आहे.

दारु पिण्यासाठी पैसे न दिल्याने लहान

दिल्याने आरोपी उमेश अशोकराव सोळंके याच्या विरोधात गु.रं.नं.१४५/२०२४,कलम ३०२ प्रमाणे खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. प्रकरणाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक के.बी.माकणे हे करत आहेत.

२००९ मध्ये मुंडे साहेब तर आज

सभा गाजवणारे स्वत: मुंडे साहेब हे एकटेच होते. तर आडसकरांसाठी आमदार, माजी मंत्र्यांनी सभा दणाणून सोडल्या. त्यामुळे मुंडे साहेबांना अडचणीत आणण्याचा जोरदार प्रयत्न सुध्दा झाला. मात्र या लढाईत मुंडे यांना ५ लाख ५३ हजार ९९४ मते मिळाल्याने त्यांचा विजय झाला. रमेश आडसकरांना ४ लाख १३ हजार ४२ मते मिळाल्याने दिग्गजांची फौज त्यांच्या कामी आली नाही. उलट मुंडे साहेबांनी पुढे केलेल्या चेहऱ्यांपैकी पुढे बाळासाहेब आजबे आणि लक्ष्मण पवार हे आमदार झाले. २००९ च्या निवडणुकीत मुंडे साहेबांची जी राजकीय स्थिती होती, तीच आज महाविकास आघाडीचे उमेदवार बजरंग सोनवणे यांची आहे. भाजप उमेदवार पंकजा मुंडे यांच्या व्यासपीठावर नेत्यांना जागा पुरत नाही तर दुसरीकडे सोनवणे यांच्या सोबतीला संदिप क्षीरसागर, साहेबराव दरेकर, पृथ्वीराज साठे सोडले तर सर्व नवखेच असतात. त्यामुळे यावेळच्या निवडणुकीत बजरंग सोनवणेंसाठी कार्यकर्ते, मतदार कामी पडतात की पंकजा मुंडे यांच्या विजयासाठी नेत्यांची फौज आपली ताकद दाखवतात याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.

विदर्भातील काही

काँग्रेसमध्ये होणार आहे.**गडचिरोली:** गडचिरोली मतदारसंघाची ओळख अनुसूचित जमातींसाठीचा राखीव मतदारसंघ अशी असून, भाजपने येथून विद्यमान खासदार अशोक नेते यांना उमेदवारी दिली आहे. तर काँग्रेसकडून नामदेव किरसान निवडणूक रिंगणात उतरले आहेत. **चंद्रपूर:** भाजपने राज्याचे वनमंत्री सुधीर मुनगंटीवार यांना चंद्रपूर मतदारसंघात निवडणूक रिंगणात उतरवले आहे. मुनगंटीवार यांना लोकसभा निवडणूक लढवण्याची इच्छा नव्हती मात्र, पक्षाने त्यांना उमेदवारी दिली आहे. तर काँग्रेसने येथून दिवंगत खासदार बाळू धानोरकर यांच्या पत्नी प्रतिभा धानोरकर यांना उमेदवारी दिली आहे. कुणबी विरुद्ध इतर ओबीसी असा सामना या मतदारसंघात रंगण्याची शक्यता आहे. २०१९ च्या लोकसभा निवडणुकीत काँग्रेसचा एकमेव खासदार येथून निवडून आला होता. **रामटेक:** हा अनुसूचित जातींसाठीचा राखीव मतदारसंघ असून, रामटेकमध्ये काँग्रेस, शिवसेना आणि वंचितचे पाठिंबा असलेले अपक्ष यांच्यात तिरंगी लढत पाहायला मिळणार आहे. येथे वंचितने माघार घेतली असून, अपक्ष उमेदवार किशोर गजभिये यांना पाठिंबा दिला आहे. तर, श्याम बर्वे महाविकास आघाडीचे उमेदवार असून महायुतीने येथून राजू पारवे यांना उमेदवारी दिली आहे. यामुळे येथे तिरंगी लढत पहावयास मिळणार आहे. रामटेकमध्ये दलित मतदार मतदारांची भूमिका निर्णयाक ठरणार आहे. **भंडारा-गोंदिया:** काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नानाभाऊ पटोले यांची प्रतिष्ठा पणाला लागलेला मतदारसंघ म्हणजे भंडारा-गोंदिया. या मतदारसंघातून भाजपने सुनील मेंढे या विद्यमान खासदारांना पुन्हा संधी दिली असून, काँग्रेसकडून यावेळी डॉ. प्रशांत पडोळे रिंगणात आहेत. तर बसपाकडून संजय कुंभलकर निवडणुकीच्या रिंगणात उतरले आहेत. या मतदारसंघातील लढत चुरशीची होणार आहे.

मोदी सरकारच्या मंत्रिमंडळात पंकजाताईंची वर्णी लागणार

पंकजाताई मुंडे च्या विजयाचे साक्षीदार व्हा-खा.डॉ.विकास महात्मे

माजलगाव । प्रतिनिधी

पंतप्रधान नरेंद्र मोदी सरकार मध्ये पंकजाताई ची वर्णी लागणार आहे लोकसभा निवडणुकीत पंकजाताई चा विजय निश्चित असून त्यांच्या विजयाचे साक्षीदार व्हा असे आव्हान खासदार डॉक्टर विकास महात्मे यांनी केले आहे.

बीड लोकसभेच्या महायुतीच्या उमेदवार पंकजा मुंडे यांच्या प्रचारार्थ दिनांक १७ एप्रिल रोजी दुपारी ५ वाजता शिवसेना तालुकाप्रमुख तुकाराम येवले व नगरसेवक विजय शिंदे यांच्या कार्यालयात तालुक्यातील प्रमुख कार्यकर्त्यांच्या आयोजित बैठकीत डॉक्टर महात्मे बोलत होते. या यावेळी पुढे बोलताना महात्मे म्हणाले की लोकनेते गोपीनाथराव मुंडे खासदार प्रीतम मुंडे व पंकजा मुंडे यांचा बीड जिल्ह्याच्या विकासामध्ये त्यांचा सिंहाचा वाटा आहे म्हणून उद्या आपला बीड जिल्हा विकसनशील बीड जिल्हा म्हणून त्याची ओळख निर्माण करायची असेल तर येणाऱ्या निवडणुकीमध्ये कुठल्याही जातीपातीच्या राजकारणाला थारा न देत पंकजा मुंडे ला मत म्हणजे विकासाला मत म्हणून पंकजा मुंडे यांना जास्तीत जास्त मताधिक्याने विजयी करावे असे आवाहन त्यांनी यावेळी केले. या बैठकीला रबदडे मामा अनंतराव बनसोडे बाबूलाल ढोरमारे बबनराव सरवदे तुकाराम येवले विजय शिंदे, सचिन जायभाय,उपप्राचार्य लक्ष्मीकांत सोनार नारायणराव सातपुते ज्ञानेश्वर सर्व दे अविनाश कांडोरे विजय धायगुडे राम अबुज विशाल देवकते अशोक डोने विलास नेमाने नारायण भले अशोक नवघरे ईश्वर खुरपे अंगद मुळे विनायक सोनटक्के भागवत गायकवाड उदय नरवडे वसंतराव शिंपले महादेव रुपनर अभय कपाळे गोविंद कोळेकर आदी उपस्थित होते.

डॉ.आर एस जेथलिया यांनी हीच सेवाभावी वृती कायम ठेवावी-वसंत मुंडे

माजलगाव । प्रतिनिधी

जेथलिया हॉस्पिटल ला भेट देऊन डॉ ऋषिकेश जेथलिया यांना शुभेच्छा देताना, तसेच सेवाभावी वृत्तीने वैद्यकीय व्यवसाय करत आहेत त्या बदल वसंत मुंडे,वैभव स्वामी यांनी डॉ. ऋषिकेश जेथलिया यांचे अभिनंदन केले.

पत्रकारांना आयुष्यभर मोफत तपासणी, सैनिक व सैनिकांनाच्या आई वडिलांना मोफत तपासणी, सोमवारी दुपारी पर्यंत मोफत तपासणी, अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत म्हातारी माणसं यांना मोफत तपासणी या गोष्ट डॉ ऋषिकेश जेथलिया यांच्या कडुन समजून घेऊन आनंद व्यक्त केला. याच सामाजिक जाणीव जपून वैद्यकीय व्यवसाय करा असे मार्गदर्शन वसंत मुंडे यांनी केले. महाराष्ट्र मराठी पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष वसंतरावजी मुंडे, मराठवाडा अध्यक्ष वैभवजी स्वामी,डॉ ऋषिकेश जेथलिया बाबा देशमाने, संतोषबापु जेथलिया, पत्रकार परमेश्वर सोंळके , सुदर्शन स्वामी,रविकांत उगडे,भदरगे मामा,अमर साळवे इत्यादी सर्व उपस्थित होते. याच वेळी अपघाता मध्ये निधन झालेले पत्रकार सचिन नाईक यांच्या घरी भेट देऊन.त्यांना महाराष्ट्र मराठी पत्रकार संघाच्या वतीने मदत दिली.

महापुरूष जन्मोस्तव समिती, व्यापारी महासंघ, पोलीस प्रशासनाकडून डॉ.आंबेडकर जयंती साजरी

माजलगाव । प्रतिनिधी

विश्व भुषण डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३३ जयंती माजलगाव शहरातील महापुरुष जन्मोस्तव समिति, व्यापारी महासंघ व पोलीस प्रशासन यांच्या वतीने शहर पोलीस ठाण्यात १४ एप्रिल रविवार रोजी साजरी करण्यात आली.या जयंती उत्सवासाठी उपस्थित मुख्य अतिथी प्रांताधिकारी गौरव इंगोले, उपवि.पोलीस अधिकारी डॉ. धिरज कुमार बच्चु यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अर्धाकृती दिव्य पुतळ्यास पुष्प माला अर्पण करून डॉ.आंबेडकर यांना अभिवादन केले. जयंती उत्सवासाठी महापुरूष जयंती उत्सव समितिचे अध्यक्ष अभयसिंह होके पाटील सह रामराजे रांजवण,मुख्य आयोजक रियाज काजी,शुभम प्रधान तसेच व्यापारी महासंघाचे अध्यक्ष सुरेंद्र रेदासनी,शहर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक केतन राठोड व त्यांचे सर्व अधिकारी,कर्मचारी यांनी परीश्रम घेतले.या वेळी अभिवादन करण्यासाठी माजलगाव शहरातील व्यापारी, राजकिय, सामाजिक, शैक्षिक क्षेत्रातील मान्यवर व्यक्तिंसह पत्रकार उपस्थित होते.

प्रभू श्रीराम मंदिर आणि भव्य सभामंडप लोकार्पणाचा मनस्वी आनंद

विद्यार्थ्यांनी अध्यात्मा बरोबरच गुणवत्ता क्षेत्रातही यशस्वी व्हावे-आ.सुरेश धस

आष्टी । प्रतिनिधी

गेली पाचशे वर्षांपासून प्रभू श्री रामचंद्र जन्मभूमी मुक्तीचा लढा अखेर यशस्वी झाला असून अयोध्ये मध्ये प्रभू श्रीरामचंद्राचे भव्य दिव्य मंदिर निर्माण झाले आहे. पुंडी येथे देखील भव्य श्रीराम मंदिराचे बांधकाम पूर्ण झाले असून भव्य दिव्य सभा मंडप देखील पूर्ण होऊन आज रामनवमीच्या निमित्ताने लोकार्पण होत असल्याचा मनस्वी आनंद होत आहे त्याचबरोबर पुंडी येथील विद्यार्थ्यांनी अध्यात्मा बरोबरच गुणवत्तेच्या क्षेत्रात देखील यश मिळवावे यासाठी सर्व सुविधायुक्त अभ्यासिका बांधकाम करण्यासाठी आपण सर्वतोपरी प्रयत्न करू असे प्रतिपादन आ.सुरेश धस यांनी केले पुंडी येथे श्रीराम मंदिर सभा मंडपाच्या लोकार्पण आणि रामनवमी निमित्त संगीत तुलसी रामायण कथा सांगता कार्यक्रमात मनोगत व्यक्त करताना ते बोलत होते.यावेळी तुलसी रामायण कथा प्रवक्ते रामायणाचार्य ह.भ.प.अमोल महाराज सातपुते, ज्येष्ठ पत्रकार प्रफुल्ल सहस्त्रबुद्धे, उत्तम बोडखे, विनोद रोडे,प्रवीण पोकळे,

माजी शिक्षणाधिकारी विक्रम पोकळे आदी उपस्थित होते.

अयोध्येतील श्रीराम जन्मभूमी मुक्तीसाठी गेली पाचशे वर्षांपासून लढा सुरू होता आणि त्यामध्ये अनेकांनी आपले प्राण अर्पण केले.अखेरीस जन्मभूमी ठिकाणी रामलल्ला प्रभू श्रीराम प्रस्थापित झाले असून आयोध्या हे तीर्थक्षेत्र जागतिक मान्यता प्राप्त झाले आहे.. आष्टी,पाटोदा आणि पुंडी येथील श्रीराम मंदिर बांधकाम आणि भव्य दिव्य असा सभामंडप बांधकाम या कामांसाठी आपला अल्पसा सहभाग होता याबाबत आपण अत्यंत समाधानी आहोत.. या श्रीराम मंदिराचे भूमिपूजन सभा मंडपाचे भूमिपूजन आणि लोकार्पणाला देखील आपणास उपस्थित रहाण्याची संधी मिळाली... अत्यंत कमी कालावधीमध्ये ही कामे पूर्ण झाली आहेत त्याबद्दल संपूर्ण ग्रामस्थांना धन्यवाद देत त्यांनी ग्रामस्थांच्या मागणीनुसार या श्रीराम मंदिराच्या परिसरामध्ये साहित्य ठेवण्यासाठी एक खोली आणि अध्यात्मिक क्षेत्रातील मान्यवरांच्या सोयीसाठी एक खोली बांधकाम करण्यासाठी २५ लक्ष रु.निधी उपलब्ध करून देऊ असे आश्वासन दिले. तसेच पुंडी गावातील एक तरुण कार्यकर्ता बळीराम थोरवे यांनी अपेक्षा व्यक्त केल्याप्रमाणे या गावातील विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षेच्या अभ्यासासाठी दूरवरील नगर येथे जावे लागते त्यामुळे विद्यार्थिनींची गैरसोय होत असल्यामुळे पुंडी गावामध्ये स्पर्धा परीक्षेच्या पुस्तकांसह अद्ययावत अशी अभ्यासिकेचे बांधकाम करण्यात यावे अशी विनंती केल्यानुसार. अशा प्रकारची वातानुकूलतेसह सर्व सोयींनी युक्त अशी अभ्यासिका बांधकाम करून देण्यात येईल असे आश्वासन आ. सुरेश धस यांनी दिले यावेळी प्रास्ताविक करताना पुंडी गावच्या सरपंच श्रीमती प्रतिभा बाळासाहेब थोरवे यांनी रामनवमीनिमित्त तुलसी रामायण कथा सांगता सोहळा आणि सभा मंडप लोकार्पण सोहळ्यासाठी उपस्थित असलेल्या सर्वांचे स्वागत केले आणि आ.सुरेश धस यांनी विविध विकास कामांसाठी विकास निधी उपलब्ध करून दिल्याबद्दल त्यांचे आभार व्यक्त केले हा संपूर्ण कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी बाळासाहेब भिकू थोरवे, सरपंच श्रीमती प्रतिभा बाळासाहेब थोरवे, बाळासाहेब हरिश्चंद्र थोरवे, उपसरपंच सुनंदा बाळासाहेब थोरवे, सतीश दळवी, रमेश ढगे, संदीप जगदाळे, बळीराम थोरवे, बाळासाहेब राम वाडेकर, शिवाजी वाडेकर, सोन्या बापू नवसुपे, आप्पासाहेब भालेराव,दत्ता सुरवसे, आजिनाथ भालेराव, तुकाराम भालेराव, शांतीलाल भालेराव, संजय जाधव, शमशुद्दीन मोमीन, संजय काकडे, यांनी बहुमोल परिश्रम घेतले. या कार्यक्रमास पत्रकार शरद गर्जे, पत्रकार अविशांत कुमकर, युवा नेते अंभोरा गावचे सरपंच सागर आमले, रावसाहेब खाकाळ, ईश्वर मेटे, शिवाजी वाघमारे, भाऊसाहेब झांजे, सीताराम झांजे,संजय घोंगडे, राजेंद्र वाळके, पै.भाऊ झांजे, उद्योजक तान्हाजी अनभुले, प्रा.दादासाहेब झांजे, अण्णासाहेब आटोळे, बाळासाहेब मोरे, ह.भ. प.सुरेश उदमले, भरत भवर, रामदास डहाळे, बापूराव खोटे आदी उपस्थित होते.

दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
गुरुवार, दि. १८ एप्रिल २०२४ ३

धारुर शहरात श्रीराम जन्मोत्सव उत्साहात व विविध कार्यक्रमानी साजरा

किल्लेधारूर : धारुर शहरात श्रीराम नवमी निमीत्त विवीध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते श्रीराम जन्मोत्सव उत्साहात साजरा करण्यात आला.शहरात भव्य मटरसायकल फेरीने श्रीरामाचे जयघोषात शहर दुमदुमले.सांयकाळी शहरातून वाजता गाजत सजलेल्या रथात श्रीराम प्रतीमेची मिरवणुक काण्यात आली.धारूर शहरात श्रीरामनवमी उत्साहात व विवीध कार्यक्रम घेऊन साजरी करण्यात आली. अंबाचौंडी मंदीर रस्त्या वरील श्रीराम पादून मंदिर,कटघरपूरा श्रीराम मंदीर, जोड आड गल्ली श्रीराम मंदीर, श्री हनूमान मंदीर मेन रोड आदी ठिकाणी दुपारी श्रीराम मंदीर जन्मोत्सव साजरा साजरा करण्यात आला. सकाळी श्रीराम भक्तानी शहरातून भव्य मोटरसायकल फेरी काढली श्रीरामाचे जयघोषाणे शहर दुमदुमले होते. सायंकाळी सजलेल्या रथात श्रीरामाची प्रतिमा ठेवून वाजता गाजत भव्य मिरवणुक काढण्यात आली श्रीराम भक्त मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

नागापूरकरांनी दिले भगवान गडावरील माऊली मंदिरासाठी ४१ लाख

बीड । प्रतिनिधी

बीड तालुक्यातील नागापूर खुर्द येथे मंगळवारी भगवानगडाचे महंत न्यायाचार्य डॉ. नामदेव शास्त्री सानप हे आले होते. त्यांच्या उपस्थितीत नागापूर खुर्द येथील भाविकांनी भगवान गडावरील संत ज्ञानेश्वर माऊली यांच्या २५ कोटी खर्चून बांधण्यात येणाऱ्या मंदिरासाठी ४१ लाख रुपये देणगी दिली. ही देणगी दोन टप्प्यात देण्यात आली. आणखी पाच लाख म्हणजे ४६ लाख रुपये देणगी देण्याचा नागापूर खुर्द येथील ग्रामस्थांचा संकल्प आहे.

महाराष्ट्राचे वैभव असलेले भगवानगड हे देवस्थान संत भगवान बाबा ,संत भीमसिंह महाराज यांच्या पदस्पर्शाने पावण झालेले आहे.त्यांचाच वारसा महंत न्यायाचार्य डॉ.नामदेव शास्त्री सानप हे पुढे चालवत आहेत .डॉ. नामदेव शास्त्री महाराजांनी भगवानगडावर संत ज्ञानेश्वर माऊलीचे जगप्रसिद्ध मंदिर बांधण्याचा संकल्प केला आहे. हे मंदिर २५ कोटी रुपये खर्च बांधण्यात येणार आहे. यासाठी देगलूर येथून

खास दगड आणण्यात येणार आहे .या मंदिराचे बांधकाम सध्या सुरू असून या मंदिरासाठी आपला हातभार लागावा यासाठी बीड तालुक्यातील नागापूर खुर्द येथील भाविक भक्तांनी मागच्या वर्षी पाडव्याला ४६ लाख रुपये देण्याचा संकल्प केला होता .हा संकल्प आता पूर्ण होत असून मागील दोन महिन्यापूर्वी ग्रामस्थांनी तीस लाख रुपये जमा करून दिले .तर मंगळवारी महंत डॉ.नामदेव शास्त्री महाराजांच्या उपस्थितीत अकरा लाख रुपये देणगी स्वरूपात दिले. आता उर्वरित पाच लाख रुपये येत्या महिन्याभरात जमा होतील.

दोन वर्षानंतर गडाचा उत्तराधिकारी नेमणार–न्यायाचार्य

दोन वर्षानंतर भगवानगडावरील सर्व कामे पूर्ण करण्यात येतील. कुठलेही काम शिल्लक राहणार नाही .त्यानंतर भगवानगडावर उत्तराधिकारी नेमून मी महाराष्ट्रभर दौरे करणार आहे. नागपूरकरांनी कधीही बोलवावे मी हजर राहील. उत्तराधिकारी नेमल्यानंतर मी गडासाठी पूर्ण वेळ मोकळा राहील. त्यावेळी धार्मिक कार्यक्रमासाठी कधीही बोलवा मी तुमच्यासाठी कधीही हजर आहे. अशी ग्वाही महंत न्यायाचार्य डॉ. नामदेव शास्त्री महाराजांनी नागापूर येथे भाविकांशी हितगुज करताना दिली. याच वेळी त्यांनी दोन वर्षानंतर भगवानगडाला नवीन वारस नेमणार असल्याचेही सुतोवाच केले.

असा संकल्प ग्रामस्थांनी केला आहे. या भव्य मंदिरासाठी आपलेही योगदान असावे यासाठी ही देणगी देण्यात आली .यापूर्वीही पंढरपूर येथील तसेच आळंदी येथील बांधकामासाठी नागापूरकरांनी योगदान दिलेले आहे. अगदी भगवान बाबा पासून या गावची भगवानगडावर श्रद्धा आहे. भगवान बाबा नंतर संत भीमसिंह महाराज यांनी हा वारसा चालवला माघ पौर्णिमेला दरवर्षी कीर्तनासाठी हे दोन्ही संत येत असत .त्यानंतर हा वारसा महंत डॉ.नामदेव शास्त्री सानप यांनी पुढे चालवला या गावची भगवानगडावर विशेष श्रद्धा असल्याने महाराजांचेही या गावावर विशेष प्रेम आहे. गावातील कुठलाही धार्मिक कार्यक्रम असला तर महंत डॉक्टर नामदेव शास्त्री महाराज कधीही टाळत नाहीत. कितीही महत्त्वाचा कार्यक्रम टाळून नागापूरकरांना विशेष वेळ दिला जातो. गडाचे आणि नागापूर खुर्द येथील भाविकांचे असे आगळे वेगळे नाते असल्याने या गडासाठी आपले योगदान हवेत. या भावनेतून गडाच्या ज्ञानेश्वर माऊली यांच्या मंदिरासाठी ४१ लाख रुपयांची देणगी भाविकांनी दिली आहे. आता उर्वरित पाच लाख येत्या महिनाभरात जमा होऊन ते गडावर पोहोचतील. असाही विश्वास ग्रामस्थांनी न्यायाचार्य डॉ.नामदेव शास्त्री महाराज यांना दिला आहे. यावेळी गावातील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. गावांमध्ये आगमन झाल्यानंतर ढोल ताशाच्या गजरात आणि फटाक्याच्या आतिषबाजीत त्यांचे जोरदार स्वागत करण्यात आले. त्यानंतर मंदिराच्या प्रांगणात भाविकांनी महाराजांचे दर्शन घेतले. याच ठिकाणी ग्रामस्थांनी सर्व देणगी जमा करून महाराजांकडे सुपूर्त केली. या कार्यक्रमाला ग्रामस्थांचा मोठा उत्साह दिसत होता.सध्या शेतकऱ्यांच्या बाबतीत प्रतिकूल परिस्थिती असूनही गडावरील निष्ठा ग्रामस्थांनी दाखवून दिली. या कार्यक्रमाला ग्रामस्थ तसेच परिसरातील भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

जनावरांचा चारा मिळेना ;पशुधन जगविणे झाले कठीण

अंबाजोगाई प्रतिनिधी

शहर व परिसरात लहान मोठ्या जनावरांच्या चारा व पाण्याचा प्रश्न गंभीर बनला आहे.

ज्वारीच्या कडब्याची एक पेंढी २२ ते २५ रूपयांना विकली जात असल्याचे शेतकरी सांगत आहेत. सोयाबीनच्या गुळीवर जनावरांची गुजराण झाली. उसाचे वाडे ही जनावरांना देण्यात आले आत्ता बहुतांश ठिकाणचा ऊस संपला. तुरीच्या गुळीवर जनावरांची भूक भागत नाही त्यामुळे ज्वारीच्या कडब्यावरच गुजराण होणार असल्याने पशुपालक शेतकऱ्यांनी कडबा खरेदीची लगबग चालू केली आहे.

शहर व परिसरात ज्वारीच्या कडब्याची एक पेंडी २२ ते २५ रुपयांपर्यंत विकली जातआहे शेकडा दोन हजार पाचशेच्या घरात गेला असून पशुधन जगवणे कठीण झाले आहे. शेतकरी हे नवीन वैरण येईपर्यंत जुना

कडबा जनावरांना खाऊ घालतात पावसात कडबा म्हणून भिजु नये म्हणून शेतकरी कडब्यावर पत्रे घालतात किंवा मेनकापड टाकून आच्छादित करतात. उन्हाळ्यात कडबा सुरक्षित ठिकाणी ठेवून गंजी लावतात.

जनावरांच्या चारा पाण्यासाठी शेतकरी हतबल झाला आहे पशु पन जगवणे अवघड झाले आहे. कडबा भिजला तर खाण्या लायक राहत नाही.त्याचा वास येण्याने जनावरे अश्या वैरणीस तोंड लावत नाहीत तालुक्यातील ज्वारी काढणीचा मोसम रंगात आला आहे. कुंबेफळ, सातेफळ, ममदापुर, पाटोदा, धानोरा, तडोळा आदीसह इतर भागातील शेतकरी कडब्याची सुरक्षित गंजी लावण्यात व्यस्त आहेत

या परिसरातील शेतकऱ्यांकडे लहान मोठी जनावरे मोठ्या प्रमाणात आहेत शिवाय शेळ्या मेंढ्या देखील आहेत. टंचाई परिस्थितीत पोषणासाठी मोठ्या जनावरांना चाऱ्याची आवश्यकता असते सोयाबीन, तुरीच्या गुळीवर जनावरांना जगविण्यात आले. आत्ता ज्वारीची पेंढी छोटी केली जात आहे. आणि भाव खूपच वाढला आहे त्यामुळे असलेल्या पेंड्यावर भागणे शक्य नसून शेतकऱ्यांना आणखी कडबा विकत घ्यावा लागत आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सवात लावलेल्या तीन डॉल्बी व समितीच्या तीन अध्यक्षावर अंबाजोगाईत गुन्हा दाखल

अंबाजोगाई । प्रतिनिधी

अंबाजोगाई शहर हे प्राचीन सांस्कृतिचा वारसा लाभलेले शहर म्हणून सर्वदूर परिचित आहे. मात्र मागील काही दिवसांपासून शहराची ही ओळख पुसण्याचे काम येथील युवापिढीच्या कडून काही प्रमाणात होऊ लागल्याने चित्र निर्माण होत आहे. सध्या शहरात कोणताही सण,उत्सव किंवा महापुरुषांची जयंती आली की या कार्यक्रमात हल्ली डॉल्बी लावून साजरा करण्याची प्रथा सुरू झाली आहे. डॉल्बीच्या आवाजावर प्रशासनाने निर्बंध देखील घातले आहेत. मात्र ते निर्बंध पायदळी तुडवण्यातच युवापिढी धन्यता मानत आहे.

दरम्यान या डॉल्बीच्या कर्णकर्कश आवाजाने नागरिक चांगलेच त्रस्त झाल्याचे दिसून येत आहे. अंबाजोगाई शहरात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३३ व्या जयंतीनिमित्त मिरवणूकित डॉल्बी लावण्यात आली होती. पोलीस प्रशासनाकडून घालून

दिलेल्या नियमांचे उल्लंघन करणाऱ्या तीन डॉल्बी चालकासह तीन जयंती उत्सव समितीचे तीन अध्यक्ष अश्या सहा जणांवर अंबाजोगाई शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दरम्यान जयंती उत्सवापूर्वी पोलीस प्रशासनाने शहरातील सर्व नागरिकांना बोलावून शांतता कमिटीची बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीत जयंती उत्सव शांततेच पार पडण्याचा सूचना सर्व जयंती उत्सव समित्यांना दिल्या होत्या. तसेच जे नियमांचे उल्लंघन करतील त्यांच्यावर गुन्हे दाखल केले जातील असे देखील बजावण्यात आले होते. आणि त्याबाबत संबंधितांना नोटिसही देण्यात आल्या होत्या. पोलीस प्रशासनाकडून मिळालेल्या माहितीनुसार अंबाजोगाई शहरात दि.१४ एप्रिल रोजी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या जयंतीनिमित्ताने डॉल्बी लावण्यात आली होती. ज्या डॉल्बी चालकाकडुन घालून दिलेल्या नियमांचे उल्लंघन करण्यात आले. मोठा आवाज केलेल्या तीन डॉल्बी आणि तीन जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष अश्या सहा जणांवर कलम १८८,३४ भादवी नुसार अंबाजोगाई शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दरम्यान डॉल्बी चालकां विरुद्ध गुन्हा दाखल केल्याने डॉल्बीचालकांचे धाबे दणाणले आहे. दरम्यान गुन्हा दाखल केल्याने अंबाजोगाई करांच्या वतीने पोलीस प्रशासनाचे अभिनंदन होऊन यापुढे अंबाजोगाई शहरात कोणतेही सण, उत्सव किंवा मोठ्या महापुरुषांच्या जयंती उत्सवासाठी डॉल्बीसाठी परवानगी देऊ नये अशी मागणी तमाम अंबाजोगाई करांच्या वतीने केल्या जात आहे.

दिंद्रुडमध्ये महात्मा फुले जन्मोत्सव जल्लोषात साजरा

दिंद्रुड । प्रतिनिधी

माजलगाव तालुक्यातील दिंद्रुड येथे क्रांतीसुर्य महात्मा ज्योतीराव फुले जन्मोत्सव मोठ्या जल्लोषात काल (दि१६) मंगळवारी साजरा करण्यात आला. गावभर काढलेल्या मिरवणुकीत महापुरुषांच्या अनेक गाण्यांवर तरुणाईं बेधुंद होत थिरकली.

येथील छत्रपती शिवाजी चौकात भव्य पंचघोड्याच्या सजवलेल्या रथात स्थापन केलेल्या महात्मा ज्योतिबा फुले व क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या पुतळ्याचे पूजन करून मिरवणुकीला सुरुवात करण्यात आली. अवघ्या दिंद्रुड नगरीतून शांततेत मिरवणूक पार पडली. गावभर मोठ्या उत्साहपूर्ण वातावरणात अनेक गाण्यांवर ठेका

धरत तरुणांनी जयंतीचा आनंद लुटला. यामध्ये 'फुले सावित्री नसती तर, मुलगी शिकली असती का...' 'एकच राजा इथे जन्मला, शिवनेरी किल्ल्यावर...' 'जगात गाजावाजा, भिमराव एकच राजा...' 'मेरे भारत का बच्चा बच्चा जय जय श्रीराम बोलेगा...' अशा महापुरुषांच्या अनेक गाण्यांवर वाजतगाजत नाचत चिमुकल्यांपासून ते मोठ्यापर्यंत सर्वांनीच मिरवणुकीत रंग भरला. गावातील शेकडो तरुण या जयंती महोत्सवात सामील झाले होते. दिंद्रुड पोलिसांनी चोख बंदोबस्त ठेवला होता.

अपघाती मृत्यू झालेल्या सचिन नाईक यांच्या कुटुंबियांना पत्रकार संघाचा मदतीचा हात

माजलगाव । प्रतिनिधी

येथील तरूण पत्रकार सचिन नाईक यांच्या अपघाती निधनामुळे माजगावकर उमद्या पत्रकाराला मुकले आहेत, अशा शब्दांत महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे यांनी आपल्या शोक भावना व्यक्त केल्या.

बुधवार, १७ एप्रिल रोजी प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे यांनी नाईक यांच्या निवासस्थानी भेट देऊन त्यांच्या कुटुंबीयांचे सांत्वन केले. यावेळी महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाच्या वतीने नाईक यांच्या कुटुंबियांना त्यांचे वडील, बंधू यांच्याकडे अर्थिक मदत सुपूर्द करण्यात आली. माजलगाव येथील तरूण पत्रकार सचिन

नाईक यांचे काही दिवसांपूर्वी अपघाती निधन झाले. सचिन नाईक हा कुटुंबातील कर्ता होता. त्यांच्यावर कुटुंबाची जबाबदारी होती. आई – वडील वयोवृद्ध आहेत. नाईक कुटुंबियांवर कोसळलेल्या दुःखात महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ सहभागी आहे. मदतीचा हात म्हणून महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघातर्फे प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे यांच्या पुढाकारातून मराठवाडा अध्यक्ष वैभव स्वामी, राज्य कार्यकारिणी सदस्य बाबा देशमाने, प्रा. सुदर्शन स्वामी, परमेश्वर सोळंके, किसन भदर्गे, रविकांत उघडे,संतोष जेथलिया यांनी सांत्वनपर भेट घेत आर्थिक मदत केली.

३९ बीड लोकसभा सार्वत्रिक निवडणूक अंतर्गत स्थापन करण्यात आलेल्या माध्यम सनियंत्रण व प्रमाणीकरण समिती कक्षास जिल्हा दंडाधिकारी तथा जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी दीपा मुधोळ– मुंडे यांनी आज भेट देऊन पाहणी केली. यावेळी कक्षाच्या प्रमुख व समितीच्या सदस्य सचिव असलेल्या माहिती अधिकारी अंजू निमसरकर यांनी येथील कामकाजाची माहिती दिली.

अहमदपुर-अंबाजोगाई महामार्ग वेड्या बाभुळीने व्यापला

असंख्य दुचाकीस्वारांचा झाडांमुळे अपघात, आठ ते दहा जणांचा मृत्यू तर अनेक जखमी

अंबाजोगाई । प्रतिनिधी

अंबाजोगाई – अहमदपुर ते अहमदनगर या राष्ट्रीय महामार्गावर सध्या वेड्या बाभुळीने व्यापाला असून या झाडांमुळे दुचाकी स्वारांसह मोठ्या वाहनांचे अपघात मोठ्या प्रमाणात वाढले आहेत. दुचाकी चालविण्यासाठी रस्त्यालगत असलेल्या पट्टीवरून बाभळीच्या फांद्या आल्याने दुचाकी स्वार मोठ्या वाहनांच्या लाईन मध्ये गाड्या चालवू लागले आहेत. त्यामुळे अपघातांचे प्रमाण वाढले आहेत. या सहा महिन्यात आठ ते दहा जणांचा अहदमपुर ते अंबाजोगाई या महामार्गावर अपघाताने मृत्यू झाला असून अनेक जण जखमी आहेत.

या रस्त्यावरील झाडे तोडण्याची जबाबदारी कंत्राटदाराची का? राष्ट्रीय महामार्ग कार्यालयाची असा प्रश्न उपस्थित होत असून हे दोघे जण आणखी किती जणांच बळी

घेणार असा सवाल नागरीक करू लागल आहेत.

अहमदपुर ते पिंपळा (धा) हा राज्य मार्ग केंद्र शासनाच्या राष्ट्रीय महामार्गामध्ये वर्गीकरण करण्यात आला या मार्गाला ५४८(ड) क्रमांक मिळाला. राष्ट्रीय मार्गाचा दर्जा मिळाल्यामुळे लातूरच्या एका कंपनीने या महामार्गाचे काम केले. परंतु सध्या या मार्गावर वेड्या बाभुळीचे झाडे दुचाकीच्या लेनच्या मधोमद आल्यामुळे अपघातांचे प्रमाण मोठ्या प्रमाणावर वाढले आहे. या झाडांमुळे सात ते आठ जणांनी आपला जीव गमावला असून कित्येक जण लातूरच्या खाजगी रूग्णालयात उपचार घेत आहेत. याच मार्गावर मांजरसुंबा ते पाटोदा दरम्यान मोठे अपघात झाले आहेत. यामध्ये १५ ते २० जणांनी जीव गमावला आहे. प्रत्यक्षदर्शीनी पाहणी केल्यानंतर या मार्गावरील अपघाताचे कारण वेड्या बाभळीच्या झाडामुळे होत असल्याचे निदर्शनास आले. त्यानंतर राष्ट्रीय महामार्गाचे कार्यालय जागे होवून संबंधीत कंत्राटदाराकडून मांजरसुंबा

राष्ट्रीय महामार्ग कार्यालय रस्ते मोकळे करणार का? –कालिदास आपेट

ते पाटोदा या महामार्गावरील सर्व झाडे तोडून हा रस्ता मोकळा करून दिला. परंतु अहमदपुर ते पिंपळा(धा) या रस्त्यालगत अशीच झाडे मोठ्या प्रमाणावर वाढल्यामुळे अपघातांचे देखील प्रमाण तेवढ्याच पटीने वाढले आहेत. संबंधीत महामार्ग एकद्या एजन्सी कडून तयार करून घेतला असला तरी त्या कामाची रक्कम टोक नाक्याच्या माध्यमातून वसुल होईपर्यंत या मार्गाची जबाबदारी संबंधीत एजन्सीचीच असते. परंतु या मार्गावर मोठ्या प्रमाणावर झाडे वाढल्यामुळे अपघातांचे प्रमाण वाढले आहे. संबंधीत झाडे एजन्सी किंवा राष्ट्रीय महामार्ग कार्यालय तोडणार आहे की नाही आणखी किती जणांचा जीव घेण्याची वाट पाहत आहे. असा संतप्त सवाल उपस्थित होवू लागला आहे.

या मार्गावर मृतास कारणीभूत ठरलेल्या कार्यालय व एजन्सीवर मनुष्य वधाचे गुन्हे दाखल करावेत

अहमदपुर ते अंबाजोगाई या राष्ट्रीय महामार्गाचे काम अद्यापही अर्धवट अवस्थेत असून पिंपळा येथे दोन तुकडे अर्धवट अवस्थेत ठवेलेले आहेत. तसेच रस्त्यालगत वेड्या बाभळीचे झाडे वाढल्यामुळे या मार्गावर अपघातांचे प्रमाण वाढले असून या अपघातामध्ये या सहा महिन्यात सुमारे आठ ते दहा जणांनी जीव गमावला असून अनेक जण जखमी आहेत. या अपघाताला कारणीभूत ठरलेल्यावर सदोष मनुष्यवधाचे गुन्हे दाखल करावेत.
– कालिदास आपेट (कार्याध्यक्ष शेतकरी संघटना)

जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख, बीड यांचे कार्यालय
शासकीय ईमारत, चांदमारी वसाहत, धानोरा रोड, बीड–४३११२२
दुरध्वनी क्र.०२४४२–२२२५८६ ई–मेल dslrbeed@yahoo.com
क्रमांक/आस्था–२/एस.आर.२४/२०२२ बीड दिनांक–१३–०२–२०२४

जाहीर सुचना

१)नामदेव बाबु वनवे २) पोपट बाबु वनवे वरील दोन्ही रा.पोखरी ता.आष्टी जि.बीड

विरुद्ध

१.तालुका निरीक्षक भूमि अभिलेख, आष्टी, २.भगवान पोपट खांडवे, ३.दादासाहेब शंकर वनवे, ४.देवराव बाबासाहेब वनवे, (मयत) वारस, ४–१.बंडु पि.देवराव वनवे ४–२.महादेव पिता देवराव वनवे, ५.अशोक पोपट इंगवले रा.तपणेश्वर गल्ली, जामखेड ता.जामखेड जि.अहमदनगर, ६.मोतीलाल काशिनाथ लोखंडे रा.आष्टा हरिनारायण ता.आष्टी जि.बीड वरील सर्व रा.पोखरी ता.आष्टी जि.बीड

या जाहीर सुचनेद्वारे सुचित करण्यात येते की, अर्जदार यांनी गैरअर्जदार यांचेविरुद्ध जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख बीड यांचे न्यायालयात मौजे पोखरी, ता.आष्टी जि.बीड येथील सर्व्हे नंबर १२८ चे पोटहिस्सा मोजणी नमुना नंबर १२ व फेरफार क्र.६३२ रद्द करणे बाबत अपील महाराष्ट्र जमीन महसुल अधिनियम १९६६ चे कलम २४७ अन्वये अपील अर्ज दाखल केलेले आहे.

वरील गैरअर्जदार यांना जाहीर सुचनेद्वारे कळविण्यात येते की, वरील प्रकरणी दिनांक २४–०४–२०२४ रोजी वेळ दुपारी १२.३० वाजता जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख बीड यांचे कार्यालय, चाँदमारी शासकीय वसाहत, पालवण चौकाजवळ, धानोरा रोड, बीड ता.जि.बीड यांचे समोर सुनावणी आहे. वरील नमुद गैरअर्जदार यांनी नमुद तारखेस न्याय कक्षेत सुनावणीस उपस्थित रहावे.

वरील नमुद गैरअर्जदार, वरील नमुद तारखेस गैरहजर राहील्यास प्रकरणात एकतर्फी सुनावणी घेण्यात येईल व प्रकरण पुढे चालविण्यात येईल याची नोंद घ्यावी.

स्वाक्षरित/–
(कृष्णा शिंदे)
जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख, बीड

राज्यात ८० हजार हेक्टरवरील पिकांचे नुकसान!

पुणे जिल्ह्यातील ग्रामीण भागात जोरदार पावसाची हजेरी

पुणे : गेले आठ दिवस राज्यात पावसाने थैमान घातले असून, मागील आठ दिवसांत (९ एप्रिलपासून) आतापर्यंत राज्यात एकूण ७९,८४८ हेक्टरवरील पिकांचे नुकसान झाले असल्याची प्राथमिक माहिती कृषी विभागाकडून समोर आली आहे. दरम्यान, दि.१६ रोजी पुणे आणि जिल्ह्याच्या ग्रामीण भागात जोरदार पावसाची हजेरी पाहायला मिळाली. जिल्ह्यातील ग्रामीण भागांमध्ये पावसाचा जोर अधिक होता. परिणामी, या पावसामुळे शेतकऱ्यांच्या उन्हाळी बाजरी, मूग, भाजीपाला पिके, चारा पिकांचे मोठे नुकसान झाले आहे. तसेच पुण्यातील पाषाण, सोमेश्वरवाडी, कोथरूड, औंध, बाणेर, वारजे, सिंहगड रस्ता परिसरात जोरदार पावसाने हजेरी लावली.

राज्यात गेल्या आठवडाभरात कोकण वगळता सर्व भागांमध्ये पावसाची हजेरी पाहायला मिळाली आहे. या अवकाळी पावसामुळे अमरावती जिल्ह्यात सर्वाधिक ५३,४०२ हेक्टरवरील पिकांचे नुकसान झाले आहे. त्यानंतर अकोला जिल्ह्यात ११ हजार १५७ हेक्टर, बुलढाणा जिल्ह्यात ६,५१३ हेक्टर, जळगाव जिल्ह्यात ३ हजार ९८४ हेक्टर, यवतमाळ जिल्ह्यात २,४९४ हेक्टर, बीड जिल्ह्यात १,०२१ हेक्टर, वाशिम जिल्ह्यात ३८८ हेक्टर, वर्धा जिल्ह्यात ३६८ हेक्टरवरील पिकांचे नुकसान झाले आहे. भंडारा जिल्ह्यात १३ हेक्टर, गडचिरोली जिल्ह्यात ११ हेक्टर, जालना जिल्ह्यात १३४ हेक्टर, नागपूर जिल्ह्यात ९० हेक्टर, गोंदिया जिल्ह्यात ४५ हेक्टर, चंद्रपूर जिल्ह्यात ४ हेक्टर, नंदुरबार जिल्ह्यात १२२, धाराशिव जिल्ह्यात ३०८ हेक्टर, लातूर जिल्ह्यात ९५ हेक्टर तर संभाजीनगर जिल्ह्यात १६३ हेक्टरवरील पिकांचे नुकसान असे एकूण राज्यात जवळपास ७९,८४८ हेक्टरवरील पिकांचे नुकसान झाल्याचे कृषी विभागाच्या आकडेवारीत म्हटले आहे.

फळपिकांचे मोठे नुकसान

गेल्या आठवडाभरापासून भर उन्हाळ्यात सुरु असलेल्या या अवकाळी पावसामुळे उन्हाळी पिकांना मोठा फटका बसला आहे. यात प्रामुख्याने गहू, हरभरा, ज्वारी, मका, मूग, तीळ, बाजरी तसेच कांदा, भाजीपाला व पपई, संत्रा, लिंबू, मोसंबी, केळी, पपई, कलिंगड या फळपिकांचे मोठे नुकसान झाले आहे. तर काही भागांमध्ये वादळी वाऱ्यामुळे शेतकऱ्यांच्या घरावरील छप्परे उडून गेली आहेत. तर काही भागांत वीज पडून जनावरे आणि नागरिकांचा मृत्यू झाल्याच्या काही घटना देखील समोर आल्या आहेत.

नागपुरी म्हैस दुग्ध उत्पादनात देते भरभराट

महाराष्ट्रात सध्या शेतकरी दुग्ध व्यवसायाला मोठ्या प्रमाणात प्राधान्य देत आहे. शेतीला जोडधंदा म्हणून केल्या जाणाऱ्या या व्यवसायामुळे राज्यातील शेतकऱ्यांची मोठ्या प्रमाणात आर्थिक भरभराट झाली आहे. त्यामुळे आता तुम्ही देखील नव्याने एखादी जातिवंत म्हैस खरेदी करण्याचा विचार करणार असाल. तर महाराष्ट्रातील प्रसिद्ध नागपुरी म्हशीबद्दल अधिक माहिती जाणून घ्यायला हरकत नाही.

नागपुरी म्हैस ही मूळची महाराष्ट्राच्या विदर्भ प्रांतातील गावरान म्हैस आहे. मध्य भारतातील प्रमुख स्थान असलेल्या नागपूरच्या आसपास परिसरात आढळते. त्यामुळे या जातीच्या म्हशीला 'नागपुरी म्हैस' म्हणून संबोधले जाते.

या जातीची म्हशीचे मुख्य वैशिष्ट्ये म्हणजे ती दुष्काळ आणि इतर खडतर परिस्थितही तग धरून राहते. नागपुरी म्हशीच्या बेरारी, गावराणी, पूर्णाथडी, वऱ्हाडी, गवळाऊ, आर्वी, गंगौरी, शाही, एलीचपुरी आणि चंदा अशा उपजाती पाहायला मिळतात.

किती दूध देते? : नागपूर म्हैस ही कमी आहारात आणि अगदी बिकट परिस्थितीमध्ये देखील तग धरून राहते. तिच्या चारा पाण्याकडे दुर्लक्ष झाल्यास तिच्यावर फारसा परिणाम होत नाही. त्यामुळे ती अधिक दूध देणाऱ्या म्हशींच्या जातींमध्ये गणली जाते. नागपुरी म्हैस आपल्या एका वेताच्या काळात जवळपास अकराशे लिटरपर्यंत दुध देण्यासाठी सक्षम असते.

नागपुरी म्हशीचे वैशिष्ट्ये? नागपुरी म्हशीचे शरीर उत्तर भारतात आढळणाऱ्या इतर म्हशींच्या तुलनेत लहान आणि वजन तुलनेने कमी असते. नागपुरी म्हशीच्या शरीराचा रंग सामान्यतः काळा असतो. याशिवाय या म्हशीच्या चेहऱ्यावर, पायांवर आणि शेपटीच्या टोकावर पांढरे डाग पाहायला मिळतात. नागपूरी म्हशीचे शिंगे लांब असतात. तसेच शिंगे सपाट, वाकलेले असतात आणि दोन्ही शिंगे मानेच्या बाजूला जवळजवळ खांद्यापर्यंत निमुळती असतात.

नागपुरी म्हशीचा चेहरा सरळ आणि पातळ असतो. या म्हशीची मान लांब असते. या जातीच्या म्हशीची शेपटी ही आखूड असते. नागपुरी म्हशीच्या रेड्याची उंची ही सरासरी १४५ सेमी असते. तर नागपुरी म्हशीची सरासरी उंची ही १३५ सेमी इतकी असते.

किती असते किंमत? : साधारणपणे अधिक दूध देण्यास सक्षम असणारी ही म्हैस आपल्या गुणवैशिष्ट्यांमुळे शेतकऱ्यांच्या नेहमीच पहिली पसंती असते. त्यामुळे तिला बाजारात किंमत अधिक असल्याचे पाहायला मिळते. नागपुरी म्हैस ही जवळपास ९० हजार रुपयांपर्यंत मिळते. त्यामुळे आता तुम्ही देखील दुग्ध व्यवसायात अधिक नफा मिळवण्याचा विचार करत असाल तर नागपुरी म्हैस तुमच्यासाठी योग्य जात ठरू शकते.

चारा छावणी, दूध अनुदान, लसीकरण, नुकसानभरपाईसाठी इअर टॅगिंग बंधनकारक!

पुणे : राज्यात गायी, म्हशी, शेळ्या, मेंढ्या या पशुधनाची संख्या मोठ्या प्रमाणात आहे. मात्र, अनेकदा जंगली प्राण्यांच्या हल्ल्यात शेतकऱ्यांना आपल्या या पशुधनाला मुकावे लागते. किंवा मग संसर्गजन्य रोगराईमुळे पशुधनाचा मृत्यू होतो. अशावेळी शेतकऱ्यांना मोठ्या आर्थिक फटका सहन करावा लागतो. मात्र, आता केंद्र सरकारच्या निर्देशानुसार शेतकऱ्यांना नुकसानभरपाई मिळण्यासाठी आपल्या पशुधनाचे 'इअर टॅगिंग' करणे बंधनकारक असणार आहे. विशेष म्हणजे दुष्काळजन्य परिस्थितीत चारा छावणीचा लाभ मिळण्यासाठी देखील 'इअर टॅगिंग' बंधनकारक असणार आहे. तरच शेतकऱ्यांना चारा छावणींचा लाभ मिळेल, असे राज्याच्या कृषी, पशुसंवर्धन आणि दुग्धविकास विभागाकडून स्पष्ट करण्यात आले आहे.

इतकेच नाही यात तर शेतकऱ्यांना मिळणारे दूध अनुदान हे देखील याच 'इअर टॅगिंग'च्या माध्यमातून दिले जाते. त्यामुळे केंद्राच्या सूचनांनुसार 'इअर टॅगिंग' सध्याच्या घडीला दूध अनुदान आणि दुष्काळी परिस्थितीमध्ये जनावरांना चारा छावणी मिळणे शेतकऱ्यांना मुश्कील होऊ शकते. राज्य सरकारने याबाबत काही दिवसांपूर्वी शासन निर्णय जाहीर केला होता.

या शासन निर्णयानुसार कार्यवाही केली जाणार असल्याने उन्हाळ्यात उभारल्या जाणाऱ्या चारा छावण्यात आपली जनावरे दाखल करताना पशुपालकांना अडचणींचा सामना करावा लागू शकतो. असेही कृषी, पशुसंवर्धन आणि दुग्धविकास विभागाने म्हटले आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी आपल्या सरसकट सर्वच पशुधनाचे 'इअर टॅगिंग' करून घ्यावे, असे आवाहनही करण्यात आले आहे.

'इअर टॅगिंग' का आहे महत्वाचे?

जंगली प्राण्यांच्या हल्ल्यात पशुधनाचा वन विभागाकडून बाजारमूल्यानुसार भरपाई मिळते. मात्र, त्यासाठी पशुसंवर्धन विभागाकडून जनावराचे मृत्यू प्रमाणपत्र मिळण्यासाठी 'इअर टॅगिंग' आवश्यक आहे. 'इअर टॅगिंग' नसेल तर राज्य सरकारकाच्या चारा छावण्यांमध्ये शेतकऱ्यांना लाभ मिळणार नाही.

दूध अनुदान मिळण्यासाठी 'इअर टॅगिंग' बंधनकारक करण्यात आले आहे. सांसर्गिक रोगांना प्रतिबंध व नियंत्रणादरम्यान लसीकरणासाठी 'इअर टॅगिंग' बंधनकारक करण्यात आले आहे. 'इअर टॅगिंग' नसेल तर बाहेरच्या राज्यातून महाराष्ट्रात पशुधनाची वाहतूक करता येणार नाही. पशुंच्या खरेदी-विक्रीसाठी 'इअर टॅगिंग' बंधनकारक करण्यात आले आहे.

खरीप हंगामातील चारा व गवत पिकांचे लागवड तंत्रज्ञान

पश्चिम महाराष्ट्रात पशुपालन व दुग्ध व्यवसाय हा शेतीला पूरक जोडधंदा तसेच अधिक उत्पन्न व आर्थिक स्थैर्य देणारा व्यवसाय म्हणून ओळखला जातो. दुग्ध व्यवसायात मिळणारे उत्पादन हे पशुच्या अनुवांशिकतेवर आणि त्याला मिळणाऱ्या संतुलित आहारावर अवलंबुन असते. शेतकऱ्यांमध्ये चारा पिकांच्या सुधारित वाणांच्या लागवडीबाबत असलेल्या अज्ञानामुळे बहुतेक ठिकाणी हिरव्या चाऱ्याची कमतरता ३५ ते ४० टक्के पर्यंत दिसून येते.

पशु आहारात दर्जेदार हिरव्या चाऱ्याचे महत्त्व : १.जनावरांची निरोगी वाढ व प्रजनन क्षमता टिकवण्यासाठी हिरवा चारा आवश्यक आहे. २.हिरवा चारा चवदार व पाचक असल्याने आहारातील महत्वाचे घटक नैसर्गिक स्वरूपात उपलब्ध झाल्याने जनावराचे शरीराच्या कोणत्याही अवयावर ताण न येता पचन होते व तापमान नियंत्रित राहण्यास मदत होते. ३.जनावरांच्या आहारात हिरव्या चाऱ्याची कमतरता असल्यास उत्तम खुराक देवुन सुध्दा जनावरांचे उत्पादनक्षम वय व उत्पादन यावर विपरीत परिणाम होवू शकतो. ४.दर्जेदार हिरव्या चारा अभावी गाभण गायींना कमजोर व रोगट वासरे निपजतात. ५.आहारात जास्त प्रमाणात खुराक व कमी प्रमाणात हिरवा चारा असे प्रमाणे जास्त काळ राहिल्यास जनावरांच्या पचन संस्थेवर विपरीत परिणाम होतो.

मका : मका हे जलद वाढणारे, पालेदार, सकस, रुचकर, अधिक उत्पादनक्षम, पौष्टिक तसेच भरपूर शर्करायुक्त पदार्थ असणारे चारा पीक आहे. मक्याच्या चाऱ्यापासून उत्तम दर्जाचा मुरघासही तयार करता येतो. हिरव्या चाऱ्यात ९ ते ११ टक्के प्रथिनांचे प्रमाण असते. जून-जुलै महिन्यात पाभरीने ३० सेंमी अंतरावर पेरणी करावी. प्रति हेक्टरी १०० किलो नत्र, ५० किलो स्फुरद व ५० किलो पालाश द्यावे. यापैकी ५० किलो नत्र, ५० किलो स्फुरद व ५० किलो पालाश पेरणीच्यावेळी व उर्वरीत ५० किलो नत्राचा दुसरा हप्ता पेरणीनंतर एक महिन्याने द्यावा.

ज्वारी : हे महाराष्ट्रातील सर्वात लोकप्रिय असे महत्त्वाचे पारंपारिक चारा पिक आहे. अवर्षणप्रवण भागात व हलक्या जमिनीत देखील तग धरून राहण्याची क्षमता असल्याने निश्चित चारा उत्पादन देणारे पिक म्हणून या पिकाकडे पाहिले जाते. ज्वारीचा कडबा देखील जनावरांना चारा म्हणून देता येतो.

ज्वारीचे चाऱ्याकरिता विकसित केलेले वाण सुमारे ३ ते ४ मीटर उंच वाढतात. त्याची ताटे हिरवीगार, पालेदार, रसाळ, रुचकर व पौष्टिक असल्यामुळे जनावरे ती आवडीने खातात. ज्वारीच्या चाऱ्यात ८ ते १० टक्के प्रथिने असतात. या चारा पिकासाठी मध्यम ते भारी व चांगली निचरा होणारी जमीन लागते. पूर्वमशागतीच्या वेळी हेक्टरी ५ टन भरखत म्हणून शेणखत अथवा कंपोस्ट खत जमिनीत मिसळावे.

बाजरी : बाजरी हे हलक्या ते मध्यम जमिनीत घेतले जाणारे तृणधान्य वर्गातील चारा पिक असून महात्मा फुले कृषि विद्यापीठाने जायंट बाजरा या वाणाची चाऱ्यासाठी शिफारस केलेली आहे. या वाणाचा वाढीचा कल उंच असून लुसलुशीत हिरव्या चाऱ्यात प्रथिनांचे प्रमाणे ७ ते ९ टक्के असते.

बागायती मारवेल : बागायत भागात हिरव्या चाऱ्यासाठी भरपुर फुटवे गोड, (ब्रिक्स ७.५०), रुचकर, जास्त पचनियता (६१.३० टक्के) असलेला 'फुले गोवर्धन' हा मारवे गवताचा बहुवार्षिक वाण मध्यम ते भारी, कसदार व उत्तम निचऱ्याच्या जमिनीसाठी विद्यापीठाने लागवडीसाठी शिफारस केला आहे. ४५३० सेंमी अंतरावर प्रत्येक ठिकाणी दोन डोळ्यांची एक कांडी याप्रमाणे हेक्टरी ७५ हजार कांड्यांची लागवड पावसाळ्यात जून ते ऑगस्ट या कालावधीमध्ये करावी.

स्टायलो : हे व्दिदल बहुवार्षिक चारा पिक असुन जिरायत भागात हलक्या ते मध्यम जमिनीत ''फुले क्रांती'' या वाणाची पेरणी जून ते जुलै महिन्यात करावी. हे पीक आवर्षणप्रवण भागात मुरमाड व अतिशय हलक्या तसेच डोंगर उतारावरील जमीनीतही तग धरुन राहते. फळबागामध्ये अंतरपिक म्हणुन सुध्दा फायदेशीर ठरते तसेच जमिनीची धुप होवू नये म्हणुन शेततळ्याच्या भरावावर लागवड करता येते. या गवतात प्रथिनांचे प्रमाणे १२ ते १४ टक्के आढळते.

दिन विशेष

महत्वाच्या घटना

- १३३६ : दक्षिणेमध्ये विजयनगर हिंदू राज्याची स्थापना झाली.
- १३३६ : हरिहर व बुक्क यांनी विजयनगरच्या हिंदू राज्याची स्थापना केली.
- १७०३ : औरंगजेबाने सिंहगड ताब्यात घेतला.
- १७२० : शाहू छत्रपती यांच्याकडून पहिले बाजीराव पेशवे यांना कर्हाडनजीक मसूर येथे पेशवाईची वस्त्रे मिळाली.
- १८३१ : 'यूनिव्हर्सिटी ऑफ अलाबामा' ची स्थापना झाली.
- १८५३ : मुंबईहून ठाण्यापर्यंत नियमित रेल्वे सेवा सुरू झाली.
- १८९८ : जुलमी प्लेग अधिकारी रँड याचा खून करणारे दामोदर चापेकर यांना फाशी
- १९१२ : टायटॅनिकमधील वाचलेले ७०५ प्रवासी घेउन आर.एम.एस. कार्पेथिया जहाज न्यूयॉर्कला पोचले.
- १९२३ : पुण्याच्या शिवाजी मंदिरात शिवजयंतीला छत्रपती शिवाजी महाराज यांच्या संगमरवरी अर्धपुतळ्याची स्थापना. हा राज्यातील पहिला शिवपुतळा. या पुतळ्याचे अनावरण मंदिराचे देणगीदार दिवंगत गणेश गोखले यांचे चिरंजीव डॉक्टर महादेव गोखले यांच्या हस्ते करण्यात आले.
- १९२४ : सायमन व शूस्टर यांनी पहिले शब्दकोड्यांचे पुस्तक प्रकाशित केले.
- १९३० : क्रांतिकारकांनी चितगाव येथील शस्त्रागार लुटले.
- १९३० : आज काहीही बातमी नाही असे बी. बी. सी. या नभोवाणी केंद्रावरुन सांगण्यात आले.
- १९३६ : पेशव्यांची राजधानी असणार्या पुण्यातील शनिवारवाडा पुरातत्व विभागाकडे सुपूर्त करण्यात आला.
- १९५० : आंध्र प्रदेशातील तेलंगणा येथील पोचमपल्ली खेड्यातील ८० एकर जमीनीच्या भूदानाने विनोबा भावे यांची भूदान चळवळ सुरू झाली.
- १९५४ : गामल अब्दल नासर याने इजिप्तची सत्ता ताब्यात घेतली.
- १९७१ : एअर इंडियाचे पहिले बोईंग ७४७ जंबो जेट विमान 'सम्राट अशोक' शाही दिमाखात सकाळी ८-२० वाजता सांताक्रूझ विमानतळावर दाखल.
- २००१ : भूसंलग्न उपग्रह प्रक्षेपक (- १) वाहकाचे रशियन बनावटीच्या क्रायोजेनिक इंजिनाच्या साहाय्याने श्रीहरिकोटा तळावरून यशस्वी प्रक्षेपण

जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

- १७७४ : सवाई माधवराव पेशवा यांचा पुरंदर किल्ल्यावर जन्म (मृत्यू: २७ आक्टोबर १७९५)
- १८५८ : महर्षी अण्णासाहेब तथा धोंडो केशव कर्वे स्त्रीशिक्षण व विधवा विवाह यातील कर्ते समाजसुधारक, पद्मभूषण, भारतरत्न (मृत्यू: ९ नोव्हेंबर १९६२ मुरुड)
- १९०१ : भारतीय स्वातंत्र्य सेनानी, राजकारणी व प्रशासक चंदेश्वर नारायण प्रसाद सिंह यांचा जन्मदिन.
- १९१० : विश्वनाथ नागेशकर, भारतीय,गोवेकर चित्रकार.
- १९१६ : ललिता पवार अभिनेत्री (मृत्यू: २४ फेब्रुवारी १९९८)
- १९६२ : पूनम धिल्लन अभिनेत्री
- १९५८ : माल्कम मार्शल वेस्ट इंडिजचा क्रिकेटपटू (मृत्यू: ४ नोव्हेंबर १९९९)
- १९९१ : डॉ. वृषाली करी यांचा जन्म.

मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

- १८५९ : क्रांतीवीर तात्या टोपे (रामचंद्र पांडुरंग टोपे).
- १९४५ : व्हॅक्यूम ट्यूब चे शोधक जॉन एम्ब्रोस फ्लेमिंग यांचे निधन. (जन्म: २९ नोव्हेंबर १८४९)
- १९५५ : अल्बर्ट आइनस्टाइन, अमेरिकन भौतिकशास्त्रज्ञ.
- १९५९ : लोकप्रिय भारतीय क्रांतीकारक व पत्रकार बरिंद्र कुमार घोष यांचे निधन.
- १९६६ : योगविद्येचे पुरस्कर्ते व शारीरिक शिक्षणतज्ञ जगन्नाथ गणेश गुणे तथा स्वामी कुवलयानंद यांचे निधन. (जन्म: ३० ऑगस्ट १८८३ डभई, गुजराथ)
- १९९५ : पंचांगकर्ते आणि ज्योतिषशास्त्राचे व्यासंगी अभ्यासक पंडित धुंडिराजशास्त्री ऊर्फ अण्णा लक्ष्मण दाते यांचे निधन.
- १९९९ : आंतरराष्ट्रीय ख्यातीचे छायाचित्रकार रघुवीर सिंह यांचे निधन. (जन्म: २२ ऑक्टोबर १९४२ जयपूर)
- २००१ : प्राणीशास्त्र, वनस्पतीशास्त्र आणि भूगोल आदी विषयातील पार्श्वभूमी असलेले नार्वेशियान लेखक थोर हेयरडाल यांचे निधन.
- २००२ : नॉर्वेजियन दर्यावर्दी संशोधक थोर हेअरडल, मानववंशशास्त्रज्ञ यांचे निधन. (जन्म: ६ ऑक्टोबर १९१४)
- २००२ : महाराष्ट्र विधान सभेचे अध्यक्ष शरद दिघे यांचे निधन.
- २००३ : भारतीय 'हिंदी साहित्यिक व साहित्यकार' सुधाकर पाण्डेय यांचे निधन.

यंदा मोहफुलाचे उत्पादन घटले; शेतकऱ्यांचा रोजगार हिरावला!

नाशिक : राज्यात एकदा मार्च महिना चालू झाला की नाशिक आणि आसपासच्या परिसरात मोहफूल वेचणीचा हंगाम सुरू होतो. साधारणपणे नाशिक जिल्ह्यातील पेठ, सुरगाणा, त्र्यंबकेश्वर हे तालुके आणि नंदुरबारचा काही भाग तसेच अहमदनगर काही भागात ही मोहफूल वेचणी केली जाते. या पट्ट्यात सह्याद्रीच्या दऱ्याखोऱ्यात दरवर्षी मोठ्या मोहफुले बहरलेली असतात. ज्यामुळे ऐन उन्हाळ्याच्या दिवसांमध्ये शेतकऱ्यांना या फुलवेचणीतुन मोठी कमाई मिळते. मात्र यावर्षी या भागातील मोहफूल वेचणीला मोठा फटका बसला आहे. प्रामुख्याने वातावरणीय बदलाचा तसेच कमी पावसाचा फटका बसल्याने, मोहफुलांचे उत्पादन देखील घटले आहे.

मोहफुल माहित नाही असा एकही माणूस सापडणार नाही. मार्च महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात पानगळती झाल्यानंतर मोहाच्या झाडाला मोहफुले येतात. ही मोहफुले अगदी वासानेही मन बहरून टाकतात. डोंगर दऱ्यात आदिवासी वनपट्ट्यात ही झाडे हमखास आढळून येतात. त्यामुळे गेल्या काही वर्षात मद्यच नाही तर आदिवासी भागातील नागरिकांनी या मोहफुलाचा चांगला उपयोग करण्यास सुरुवात केली आहे.

मात्र, यंदा मोह फुलांच्या उत्पन्नात कमालीची घट झाली असून, या फुलामध्ये मोठ्या प्रमाणात घट दिसून येत आहे. त्यामुळे या भागातील आदिवासी शेतकऱ्यांच्या रोजगार आणि उदर्निवाहावर परिणाम झाल्याचे शेतकऱ्यांनी म्हटले आहे. दरवर्षी आपल्याला सात ते आठ झाडांपासून एक ते दीड पोते मोहफुलाचे उत्पादन मिळायचे, आता त्या ठिकाणी एक टोकरीभरही फुले मिळत नसल्याचे आदिवासी शेतकऱ्यांकडून सांगितले जात आहे. ज्यामुळे यंदा मोहफुलाच्या उत्पादनात मोठी घट झाल्याचे पाहायला मिळत आहे. अशातच ऐन हंगामात झालेल्या पावसामुळे या फुलांचे मोठे नुकसान झाल्याचे सांगितले जात आहे.

जिल्हा निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी घेतला संपूर्ण यंत्रणेचा आढावा

आजपासून नामनिर्देशन प्रक्रिया सुरू

माध्यम सनियंत्रण व प्रमाणीकरण समिती कक्षास जिल्हाधिकाऱ्यांची भेट

लोकसभा सार्वत्रिक निवडणूक अंतर्गत स्थापन करण्यात आलेल्या माध्यम सनियंत्रण व प्रमाणीकरण समिती कक्षास जिल्हा दंडाधिकारी तथा जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी दीपा मुधोळ- मुंडे यांनी आज भेट देऊन पाहणी केली. यावेळी कक्षाच्या प्रमुख व समितीच्या सदस्य सचिव असलेल्या माहिती अधिकारी अंजू निमसरकर यांनी येथील कामकाजाची माहिती दिली.

बीड । प्रतिनिधी

लोकसभा सार्वत्रिक निवडणुका सुरू झाल्या आहेत. ३९ बीड लोकसभा मतदारसंघात चौथ्या टप्प्यात सोमवार दिनांक १३ मे रोजी मतदान होणार असून यासाठी उमेदवाराकडून नामनिर्देशन पत्र दाखल करण्याची प्रक्रिया गुरुवार दिनांक १८ एप्रिल (आज) पासून सुरुवात होणार आहे. या धर्तीवर आज जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी दीपा मुधोळ मुंडे यांनी संपूर्ण जिल्हाधिकारी कार्यालय परिसराची पाहणी करून आढावा घेतला.

यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी, उपजिल्हा निवडणूक अधिकारी महेंद्र कुमार कांबळे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी श्रीकांत केकान, जिल्हा नियोजन अधिकारी सुधाकर चिंचाणे यावेळी उपस्थित होते. १८ एप्रिलपासून २५ एप्रिल पर्यंत ११ ते ३ वाजेपर्यंत जिल्हाधिकारी कार्यालय परिसरातील जिल्हा नियोजन कार्यालयात नामनिर्देशन पत्र निशुल्क दिले जातील. या ठिकाणीची पाहणी केली. उद्यापासून या ठिकाणी असणाऱ्या व्यवस्थेची माहिती जाणून घेतली. या ठिकाणी बीड जिल्ह्याच्या दौऱ्यावर असणारे खर्च निरीक्षक बसणार असून त्यांच्या पक्षाची पाहणीही त्यांनी यावेळी केली. या कार्यालयाच्या बाजूला असणारे जिल्हा माहिती केंद्र (नॅशनल इंफॉर्मेशन सेंटर) येथे असणारे सीव्हीजील कक्ष आणि सायबर कक्ष याची देखील पाहणी जिल्हादंडाधिकारींनी केली. जिल्हाधिकारी कार्यालय परिसरात बांधकाम सुरू असून उद्यापासून नामनिर्देशन पत्र दाखल होणार असल्यामुळे कायदा सुव्यवस्थे बाबतही प्रत्यक्ष पाहणी केली. नामनिर्देशन पत्र दाखल करणाऱ्या उमेदवारांसोबत पाच लोक असतील तसेच तीन वाहनांना परवानगी देण्यात येणार आहे. त्यामुळे या ठिकाणी योग्य व्यवस्था असावी, असे, निर्देश त्यांनी यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी यांना दिले. जिल्हाधिकारी कार्यालयात तळमजल्यावर सहा विधानसभा मतदार संघ निहाय अद्यावत मतदार याद्या ठेवण्यात आलेल्या आहेत. लोकसभा मतदारसंघात उभे असणारे उमेदवारांकरिता 'निदेशक पुस्तिका २०२३' ही मराठी तसेच उपलब्ध असणार आहे याची स्वतः खातरजमा जिल्हाधिकारी यांनी यावेळी केली. बाहेरून येणाऱ्या निरीक्षकांसाठी अपेक्षित साहित्य, उमेदवारांना आवश्यक असणारी माहिती, त्यांच्या मदतीला असणारे सहाय्यक त्यांना लागणारी माहिती याचा ही आढावा घेतला.

अंजनडोह पाणी पुरवठा योजनेचे काम सहा महिन्यांपासून बंद

हे जलजीवन आहे की जलविस्कळीत जीवन आहे?

धारूर । प्रतिनिधी

आज सगळीकडे पाणीटंचाई मोठ्या प्रमाणात जाणवू लागली आहे. यावर उपाय म्हणून सरकारकडून जलजीवन योजनेची घोषणा करण्यात आली होती. या योजनेअंतर्गत महाराष्ट्रभर गावागावात आणि दारादारात पाणी पोचवण्यासाठी मोठी आर्थिक तरतूदही करण्यात आली होती. परंतू बहुतांश ठिकाणी ही योजना जीवन सुरळीत करण्यासाठी होती की जणजीवन विस्कळीत करण्यासाठी होती असे प्रश्नचिन्ह आता उभे राहत आहे.

लाखो रुपये खर्च करूनही आज गावातील लोकांना पाण्यासाठी टँकरची वाट पाहावी लागते किंवा वणवन भटकंती करावी लागते.तालुक्यातील अंजनडोह गावासाठी देखील जलजीन मिशन अंतर्गत रेपेवाडी साठवण तलावातून वाजतगाजत पाईपलाईन करण्यात आली. परंतू पाईप लाईनचे पाणी आजही गावापर्यंत आले नाही. ते पाणी नेमके कुठे मुरले हे कुणाला समजलेच नाही. एकतर आमचा दुष्काळी भाग शेतीसाठी पाणी नाही किमान पिण्यासाठी तरी पाणी द्या म्हणून बोंबलण्याची वेळ आमच्यावर आली आहे. जलजीवन मिशन अंतर्गत झालेली पाईप लाईन ही निकृष्ट दर्जाची असून शासनाचा लाखो रु निधी वाया गेला आहे.या योजनेची वाट लावणाऱ्यांची तात्काळ चौकशी करून दोषींवर कारवाई करावी.

अंजनडोह गावातील नागरिकांची पाण्याची गरज लक्षात घेता रिपेवाडी साठवण तलावातून गावासाठी जल जीवन योजने अतर्गत पाईप लाईन जानेवारी २०२३ मध्ये मंजूर झाली होती मागील सहा महिन्यापासून गुत्तेदारणारे काम बंद ठेवले आहे .गुत्ते दारा विरोधात जी.प.चे मुख्यकार्यकारी अधिकारी तसेच माजलगाव च्या उपविभागीय अधीकारी यांच्या कडे तक्रार दाखल केली आहे .परंतु त्याची कसली च दखल न घेतल्या ने गुत्तेदार कामाकडे फिरकतच नाही.

-प्रमोद सोळंके सरपच अंजढोह

श्रीराम ग्रुप, स्वामी समर्थ प्रतिष्ठानच्या वतीने महाप्रसादाचे वाटप

युसूफवडगांव । प्रतिनिधी

केज तालुक्यातील युसुफवडगांव येथे सध्या श्रीराम नवमी जन्मोत्सव व भव्य यात्रा महोत्सव चालु असुन आज पहिल्या दिवशी रामजन्म सोहळ्यानंतर आलेल्या भाविक भक्तांना श्रीराम ग्रुप पुणे व श्री स्वामी समर्थ सेवा प्रतिष्ठानच्या वतीने महाप्रसादाचे वाटप करण्यात आले.

युसुफवडगांव येथे ३५० ते ३७५ वर्ष पुरतान श्रीराम मंदिर असुन दरवर्षी येथे श्रीराम नवमीला जन्मोत्सव सोहळा व यात्रा महोत्सवाचे आयोजन करण्यात येते. हा सोहळा पाहण्यासाठी व श्रीरामाचे दर्शन घेण्यासाठी आजुबाच्या पंचक्रोशीतुन व मोठ्या संख्येने बाहेर गावाहुन भाविक भक्त येतात हा श्रीराम नवमी जन्मोत्सव व यात्रा महोत्सव ३ दिवस चालतो त्यामध्ये विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येते.त्या अनुशंगाने गत वर्षापासुन श्रीराम नवमी अर्थात मंदिरात प्रभु श्रीरामचंद्र महाराज यांचा जन्मोत्सव सोहळा पार पडल्यानंतर श्रीराम ग्रुप पुणे व श्री स्वामी समर्थ प्रतिष्ठानच्या वतीने दर्शनासाठी येणाऱ्या भाविक भक्तांना महाप्रसादाचे वाटप करण्यात येते याही वर्षी दि.१७ एप्रिल रोजी रामजन्म सोहळ्यानंतर आलेल्या भाविक भक्तांना महाप्रसादाचे वाटप करण्यात आले.

या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सरपंच महेश गायके,प्रा.बापुसाहेब भुसारी, बाळासाहेब लामतुरे, विकास जाधव, अनिल निकम, अनंत जाधव, बाळासाहेब सपकाळ, प्रसाद कुलकर्णी, अमोल थळकरी,छत्रुगन निकम, उमाकांत सौंदणे,दयानंद सातपुते, राजु शिंदे, नागनाथ निकम, सोनु तळेकर, पोपट जाधव,शिवलिंग लामतुरे, सोनु सावंत, अभी थळकरी, संतोष इंगळे व पत्रकार सचिन उजगरे यांनी परिश्रम घेतले.

महाश्रमणजी यांच्या अहिंसा यात्रेचे बीडमध्ये होणार आगमन

बीड । प्रतिनिधी

जैन श्वेतांबर तेरा पंथाचे अकराव्ये महातपस्वी शांतीदूत, युगप्रधान आचार्यश्री महाश्रमणजी महाराज यांच्या अंहिसा यात्रेचे उद्या कडा येथे आगमन होणार आहे. त्यानिमित्त जिल्ह्यातील तेरा पंथ सभेचे त्यांचे जोरदार स्वागत करण्यात येणार आहे. त्यानंतर २६ व २७ एप्रिल रोजी त्यांची दोन दिवस व्याख्यान व प्रवचनमाला आयोजित करण्यात आली आहे. धर्मशास्त्रानुसार धार्मिक कार्यक्रमही पार पडणार आहेत. हे कार्यक्रम सर्व जाती-धर्मासाठी खुले आहेत. या कार्यक्रमाचा लाभ घ्यावा असे आवाहन तेरा पंथ सभेचे अध्यक्ष लेमकरण समदरिया, युवक परिषदेचे अध्यक्ष राहुल समदरिया आणि तेरा पंथ महिला मंडळाच्या अध्यक्षा सविता मरलेचा यांनी केले आहे.

आष्टी तालुक्यात प्रथमच आचार्य श्री महाश्रमणजी यांच्या अहिंसा यात्रेचे आगमन होत आहे.त्यांच्यासोबत १०० साधू साध्वी आहेत. शुक्रवारी सकाळी १०:३० वाजता प्रवचन सोहळा आष्टी येथील पंडीत जवाहर नेहरू विद्यालय येथे सुरू होईल.दुपारी १ ते ३ दरम्यान सर्व धर्मीयांसाठी दर्शनाचा विशेष सोहळा होईल. इतर विविध विषयांवर मार्गदर्शनही केले जाईल.रात्री ८ ते ८:३० या वेळेत आचार्य श्री महाश्रमणजी यांच्या चरणस्पर्श दर्शन होणार आहे. त्यानंतर बीडमध्ये देखील २६ व २७ एप्रिल रोजी माँ वैष्णोदवी पॅलेसमध्ये कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या निमित्ताने परिपूर्ण अशी तयारी करण्यात आली आहे. समाज बांधवांच्या वतीने विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून या कार्यक्रमांचा लाभ घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

जिल्हाधिकाऱ्यांना दिले निमंत्रण

आचार्य महाश्रमणजी महाराज हे राष्ट्रीय संत असल्याने तेरा पंथ परिषदेच्या वतीने बीडच्या जिल्हाधिकारी दीपा मुधोळ-मुंडे यांनाही व्याख्यान व प्रवचनमालेचे निमंत्रण अध्यक्ष लेमकरण समदरिया व इतर पदाधिकार्यांनी दिले असून या कार्यक्रमास प्रशासनाच्या वतीने सर्वोतपरी सहकार्य केले जाईल असे आश्वासन मुधोळ यांनी दिले आहे.

भाजपा भटक्या विमुक्त आघाडीच्या जिल्हा सरचिटणीसपदी अविनाश कांडुरे यांची निवड

माजलगाव । प्रतिनिधी

भाजपाच्या राष्ट्रीय सचिव पंकजाताई मुंडे, भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, भाजपाभटक्या विमुक्त आघाडीचे प्रदेशाध्यक्ष राहुल केंद्रे,भाजपा प्रदेश उपाध्यक्ष खा. डॉ.प्रतिम मुंडे, भाजपा भटक्या विमुक्त आघाडीचे प्रदेश सचिव ज्ञानेश्वर सरवदे यांच्या सुचने वरुन भाजपा जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के व भाजपा भटक्या विमुक्त आघाडीचे जिल्हाध्यक्ष डॉ लक्ष्मण जाधव यांनी माजी पंचायत समिती सदस्य अविनाश कांडुरे यांची दि १६ एप्रिल मंगळवार रोजी भाजपा भटक्या विमुक्त आघाडीच्या जिल्हा सरचिटणीस पदी निवड करण्यात आली असुन त्यांना निवडीचे पत्र खा.प्रितम मुंडे यांच्या हस्ते देण्यात आले.

माजलगाव तालुक्यातील माजी पंचायत समिती सदस्य अविनाश कांडुरे यांची भाजपा भटक्या विमुक्त आघाडीच्या सरचिटणीसपदी निवड झाल्यानंतर बोलताना ते म्हणाले कि माझ्यावर पक्षाने टाकलेली जबाबदारी संघटनात्मक बांधणी करण्यासाठी दिली असुन संघटनात्मक बांधणी करतांना माजलगाव विधानसभेचे भाजपा नेते रमेशराव आडसकर,भाजपा विधानसभा प्रमुख मोहनराव जगताप, केंद्रीय कार्यकारणी सदस्य डॉ. प्रकाशराव आनंदगांवकर, माजी नगराध्यक्ष डॉ.अशोकराव तिडके,भाजपा तालुकाध्यक्ष अरुण राऊत यांच्या मार्गदर्शनाखाली करणार आहे.यावेळी राहुल जाधवर,ओबीसी तालुकाध्यक्ष तात्या पांचाळ हे उपस्थीत होते.

युसुफवडगांव येथे भाविकांनी भरलेल्या मानाच्या १२ गाड्या ओढल्या

युसूफवडगांव । प्रतिनिधी

केज तालुक्यातील युसुफवडगांव येथे श्रीराम नवमी जन्मोत्सवस सोहळ्यास मोठ्या उत्साहात सुरुवात'' दशरथनंदन श्रीरामचंद्र महाराज की जय '' असा जयघोष करीत भाविकांनी भरलेल्या १२ गाड्या ओढण्याची परंपरा कायम ठेवली.

युसूफवडगांव येथे अतिशय प्राचीन राम मंदीरात प्रभू रामचंद्रासोबत सीता माता,लक्ष्मण,भरत,शत्रुघ्न,आणि मारुती या देवतांच्या पंचधातुच्या मुर्ती आहेत.मंदिरात चैत्रशुद्ध प्रतिपदेला घटस्थापना केल्यानंतर दशमीपर्यंत विविध धार्मिक कार्यक्रम पार पडले बुधवारी रामनवमी निमित्त पहाटे सर्व मुर्तींना अभिषेक घालून दुपारी प्रभुरामांची मुर्ती एका सजवलेल्या पाळण्यात ठेवण्यात आली.राममंदिरात श्रीधर महाराज रामदासी यांचे नार्दिय गुलालाचे किर्तन झाले.दुपारी बारा वाजेच्या सुमारास दशरथनंदन रामचंद्र महाराज की जय असा जयघोष करीत गुलाल पुष्प उधळून जन्मोत्सव साजरा करण्यात आला.त्यानंतर गावातून रामचंद्रांची पालखी मिरवणूक काढण्यात आली.मिरवणूक वेशीमध्ये आल्यावर १२ बैलगाड्या एकमेकांना बांधून भाविकांनी भरलेल्या या गाड्या ओढण्याचा कार्यक्रम झाला.गाड्या ओढण्याचा नेत्रदीपक सोहळा पाहण्यासाठी गावातील व परिसरातील हजारो नागरिकांनी गर्दी केली होती.

गढी महाविद्यालयात डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्साहात साजरी

गढी । प्रतिनिधी

कला व विज्ञान महाविद्यालय शिवाजीनगर येथे राष्ट्रीय सेवा योजना विभाग व सांस्कृतिक विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमीत्त व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. यावेळी व्यासपीठावर कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी म्हणून महाविद्यालयातील इतिहास विभाग प्रमुख प्रोफे. डॉ.रामहरी फाटक तसेच राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी प्रा. डॉ. राणी जाधव तर कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य प्रोफे. डॉ.सदाशिव सरकटे हे उपस्थित होते. सर्वप्रथम भारतीय संविधानाचे शिल्पकार,विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे मान्यवरांच्या हस्ते पूजन करण्यात आले. या कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी म्हणून बोलताना प्रोफे.डॉ.रामहरी फाटक यांनी असे प्रतिपादन केले की डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी आपल्या देशालाच नव्हे तर संपूर्ण जगाला आपल्या ज्ञानाच्या प्रकाशाने तेजोमय करून एक आदर्श घालून दिला आहे.बाबासाहेबांसारखा ज्ञानसूर्य आपल्या देशामध्ये घडला त्यामुळे जगामध्ये आपल्या भारताची एक उच्च दर्जाची ओळख निर्माण झाली आहे.आपल्या राष्ट्राच्या उभारणीमध्ये त्यांचे फार मोठे योगदान आहे. त्यांच्यासारखा प्रज्ञासूर्य आपल्या राष्ट्रातच नव्हे तर संपूर्ण जगामध्ये यापूर्वी झाला नाही आणि भविष्यातही होणार नाही. या कार्यक्रमाचे दुसरे प्रमुख अतिथी प्रा .डॉ.राणी जाधव यांनी आपल्या व्याख्यानातून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अष्टपैलू व्यक्तिमत्त्वावर प्रकाश टाकला. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांची उपयुक्तता पूर्वीपेक्षाही आजच्या काळामध्ये अधिक जाणवू लागली आहे. त्यांचे विचार आपल्या राष्ट्रालाच नव्हे तर संपूर्ण जगाला दिशादर्शक ठरत आहेत असे प्रतिपादन यावेळी त्यांनी केले. कार्यक्रमाच्याअध्यक्षीय समारोपात महाविद्यालयाचे प्राचार्य प्रोफे.डॉ. सदाशिव सरकटे यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी संविधान निर्मितीच्या माध्यमातून विविधतेने नटलेल्या आपल्या भारत देशाला एकसंघ ठेवण्याचे जे अमूल्य कार्य केले आहे यावर प्रकाश टाकला.तसेच जागतिक स्तरावर त्यांच्या महानतेची आज जी दखल घेतली जात आहे ती आपल्या सर्व भारतीयांसाठी अत्यंत अभिमानास्पद आहे असे प्रतिपादन केले. प्रास्ताविक प्रा. शिवाजी काकडे, सूत्रसंचालन सांस्कृतीक विभागप्रमुख प्रोफे. संतोषकुमार यशवंतकर तर आभार प्रदर्शन सांस्कृतीक विभागाच्या प्रा. डॉ. अयोध्या पवळ यांनी केले. या कार्यक्रमास प्रा.हिरा पोटकुले,प्रोफे. डॉ.धर्मराज कटके, प्रा.डॉ.रामदास खताळ,प्रा.डॉ.कलंदर पठाण,प्रा.डॉ.जाहेद अली सिद्धीकी,प्रा. डॉ. शिवलाल घुगे, प्रा.डॉ.बाळासाहेब सरपते, ग्रंथापाल डॉ. महारुद्र गव्हाणे यांच्यासह सर्व प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

महावितरण कंपनीकडून कमी दाबाने विद्युत पुरवठा

बीड । प्रतिनिधी

सध्या तप्त उन्हामुळे नागरिकांच्या जीवाची लाहीलाही होत असताना महावितरण कंपनीकडून बीड शहरात कमी दाबाने विद्युत पुरवठा करण्यात येत असल्याने सर्वसामान्य महिला, पुरुष, आबालवृद्धांसोबतच रक्तदाब, हृदयविकार, मधुमेह असलेले नागरिक त्रस्त झाले आहेत. यामुळे निदान उन्हाळा संपेपर्यंत तरी महावितरण कंपनीने योग्य दाबाने विद्युत पुरवठा करावा अशी मागणी मुक्तपत्रकार एस.एम.युसूफ़ यांनी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकातून केली आहे.

याविषयी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकात नमूद केले आहे की, सध्या सूर्य आग ओकत आहे. ऊन म्हणतंय मी आहे तर कोणी नाही. यामुळे आबाल वृद्धांपासून प्रत्येक स्त्री, पुरुष, रक्तदाब, हृदयविकार, मधुमेह असलेले नागरिक या उन्हापासून बचावासाठी कामाव्यतिरिक्त घराबाहेर पडण्यास धजावत नाहीयेत. घरी असलेले किंवा कामाच्या ठिकाणी असलेले नागरिक उन्हापासून स्वतःचा बचाव करण्याकरिता स्वतःचे रक्षण करण्याचा प्रयत्न करतात. उन्हापासून काही प्रमाणात का होईना आपल्या शरीराला व तब्येतीला जपण्याकरिता पंखे व कुलरचा आधार घेतात परंतु महावितरण कंपनीकडून कमी दाबाने विद्युत पुरवठा होत असल्याने पंखे आणि कुलर योग्य त्या गतीने चालत नाही. यामुळे त्यापासून हवा त्या प्रमाणात दिलासा मिळत नाहीये. म्हणून आबालवृद्धांपासून प्रत्येक स्त्री-पुरुष व रक्तदाब, हृदयविकार, मधुमेह असलेले नागरिक पार त्रस्त झाले आहेत. याकडे महावितरण कंपनीचे अभियंता अधिकारी व कर्मचाऱ्यांनी विशेष लक्ष देण्याची नितांत गरज आहे.

पहिल्या टप्प्यातील १०२ जागांसाठी उद्या मतदान

प्रचार थंडावला, प्रमुख लढतींवर लक्ष

पुणे । प्रतिनिधी

लोकसभा निवडणुकीतील पहिल्या टप्प्यातील प्रचार बुधवारी (दि.१७ एप्रिल) सायंकाळी थांबला आहे. १९ एप्रिल रोजी २१ राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशातील १०२ जागांसाठी मतदान होणार आहे. आठ केंद्रीय मंत्री, दोन माजी मुख्यमंत्री आणि माजी राज्यपाल हे १९ एप्रिल रोजी होणाऱ्या निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यात मैदानात आहेत. लोकसभेच्या ५४३ जागांसाठी सात टप्प्यांत मतदान होणार असून, ४ जून रोजी मतमोजणी होणार आहे.

पहिल्या टप्प्यात महाराष्ट्रातील नागपूर मतदारसंघातही मतदान होणार आहे. केंद्रीय रस्ते व वाहतूक मंत्री नितीन गडकरी नागपूरमधून विजयाची हॅट्ट्रिक करणार का, याकडे सर्वांचे लक्ष वेधले आहे. २०१४ मध्ये त्यांनी सातवेळा खासदार विलास मुत्तेमवार यांचा २.८४ लाख मतांच्या फरकाने पराभव केला होता. २०१९ मध्ये त्यांनी महाराष्ट्र काँग्रेसचे विद्यमान अध्यक्ष नाना पटोले यांचा २.१६ लाख मतांनी पराभव केला होता. केंद्रीय मंत्री किरेन रिजिजू अरुणाचल पश्चिम मतदारसंघातून निवडणूक लढवत आहेत. त्यांनी २००४ पासून तीन वेळा मतदारसंघाचे प्रतिनिधित्व केले आहे. रिजिजू यांचे प्रमुख प्रतिस्पर्धी माजी मुख्यमंत्री आणि विद्यमान अरुणाचल प्रदेश काँग्रेसचे अध्यक्ष नबाम तुकी आहेत. आसामचे माजी मुख्यमंत्री आणि केंद्रीय बंदरे, जहाजबांधणी आणि जलमार्ग मंत्री सर्बानंद सोनोवाल हे आसाममधील दिब्रुगडमधून लढत आहेत. उत्तर प्रदेशमधील मुझफ्फरनगरमधून केंद्रीय मंत्री संजीव बल्यान हे समाजवादी पक्षाचे हरिंद्र मलिक आणि बसपाचे उमेदवार दारा सिंह प्रजापती यांच्यात लढत आहेत. राजस्थानमधील अलवरमधून केंद्रीय मंत्री आणि राज्यसभा सदस्य भूपेंद्र यादव हे काँग्रेस आमदार ललित यादव यांच्या विरोधात उभे ठाकले आहेत. केंद्रीय कायदा मंत्री अर्जुन राम मेघवाल हे

राजस्थानच्या बिकानेर लोकसभा मतदारसंघातून काँग्रेसचे माजी मंत्री गोविंद राम मेघवाल यांच्या विरोधात निवडणूक लढवत आहेत. तामिळनाडूतील निलगिरी लोकसभा मतदारसंघात द्रमुकचे विद्यमान खासदार आणि माजी दूरसंचार मंत्री ए राजा आणि भाजपचे केंद्रीय मत्स्यव्यवसाय राज्यमंत्री एल मुरुगन यांच्यात चुरशीची लढत होत आहे. मध्य प्रदेशातून राज्यसभेवर निवडून आलेले मुरुगन येथून पहिल्यांदाच निवडणूक लढवत आहेत.

शिवगंगाईचे खासदार आणि वडील पी चिदंबरम यांचे पुत्र कार्ती चिदंबरम पुन्हा एकदा रिंगणात आहेत. तामिळनाडू भाजपचे अध्यक्ष के. अन्नामलाई तामिळनाडूतील कोईम्बतूर येथून निवडणूक लढवत आहेत. काँग्रेस नेते आणि मध्य प्रदेशचे माजी मुख्यमंत्री कमलनाथ यांचे पुत्र नकुल नाथ छिंदवाडामधून पुन्हा निवडणूक लढवत आहेत. त्रिपुरातील लोकसभेच्या दोन जागांपैकी पश्चिम त्रिपुरा मतदारसंघात पहिल्या टप्प्यात १९ एप्रिल रोजी मतदान होणार आहे, तेथे माजी मुख्यमंत्री बिप्लब कुमार देब आणि प्रदेश काँग्रेसचे अध्यक्ष आशिष कुमार साहा यांच्यात हाय-व्होल्टेज टक्कर होणार आहे. लोकसभेतील काँग्रेसचे उपनेते आणि माजी मुख्यमंत्री तरुण गोगोई यांचा मुलगा गौरव गोगोई आसामच्या कालियाबोर मतदारसंघातून लढत आहे. तर तरुण गोगोई शेजारच्या जोरहाटमधून पक्षाचे उमेदवार आहेत.

मणिपूरचे कायदा आणि शिक्षण मंत्री बसंत कुमार सिंग हे इनर मणिपूर जागेवरून भाजपचे उमेदवार आहेत. ते जेएनयूचे प्राध्यापक आणि काँग्रेसचे उमेदवार बिमल अकोइझम यांच्या विरोधात रिंगणात उतरले आहेत. उत्तर राजस्थानमधील भाजपचा बालेकिल्ला असलेल्या चुरूमध्ये भाजपचे उमेदवार देवेंद्र झाझरिया आणि काँग्रेसचे राहुल कासवान यांच्यात रंजक लढत पाहायला मिळत आहे.

कनिमोझी यांच्या विरोधात माजी राज्यपाल सुंदरराजन

तेलंगणाचे राज्यपाल आणि पुदुचेरीचे लेफ्टनंट गव्हर्नर या पदाचा राजीनामा देऊन अलीकडेच सक्रिय राजकारणात पुनरागमन करणाऱ्या तमिलिसाई सुंदरराजन या चेन्नई दक्षिण लोकसभा मतदारसंघातून निवडणूक लढवत आहेत. काँग्रेसच्या दिग्गज नेत्या कुमारी अनंता यांची मुलगी सुंदरराजन यांनी २०१९ लोकसभा निवडणूक द्रमुकच्या नेत्या कनिमोझी यांच्या विरोधात लढवली होती. त्यांचा मोठ्या फरकाने पराभव झाला होता. यावेळी कनिमोळी या जागेवरून पुन्हा निवडणूक लढवत आहेत. येथे राष्ट्रीय लोकशाही आघाडीचा (रालोआ) मित्रपक्ष तमिळ मानिला काँग्रेस (मूपनार) ने विजयसीलन आणि अण्णाद्रमुकने आर शिवासामी वेलुमणी यांना उमेदवारी दिली आहे.

पंकजाताई मुंडेंच्या नेतृत्वाला वाढती पसंती !

धनगरवाडीचे शेकडो कार्यकर्ते भाजपात

बीड । प्रतिनिधी

आपल्या राजकीय व सामाजिक जीवनात सर्वसामान्य व्यक्ती व त्याचा सर्वांगीण विकास हाच केंद्रबिंदू मानून लोकनेते मुंडे साहेबांच्या विचारांचा वसा आणि वारसा घेऊन पुढे चालणाऱ्या संघर्ष कन्या तथा महायुतीच्या उमेदवार पंकजाताई मुंडे यांच्या नेतृत्वाला पसंती देत धनगरवाडीच्या शेकडो कार्यकर्त्यांनी आज भाजपात प्रवेश केला.

केवळ विकास हाच आपला मुद्दा घेऊन बीड जिल्ह्याच्या विकासासाठी कटिबद्ध असलेल्या पंकजाताई यांची लोकसभेच्या निवडणुकीच्या अनुषंगाने बीड येथे भाजपा प्रचार कार्यालयात कॉर्नर मीटिंग चे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीमध्ये धनगरवाडी (ता. बीड) येथील तुळशीराम लकडे, सरपंच बारीकराव भावले, उपसरपंच सुखदेव भावले, ग्रा.प. सदस्य बाबुराव बंगाल, अमोल कोकरे, यदाबा भावले, केरबा भावले, तानाजी भावले ,माजी सरपंच ग्यानबा भावले, युवा कार्यकर्ते परमेश्वर भावले, कालिदास ठोकळ रामदास भावले ,यांच्यासह शेकडो कार्यकर्त्यांनी भाजपात प्रवेश केला. यावेळी भाजपाचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के, सर्जेराव तांदळे, नवनाथ शिराळे आदींसह कार्यकर्ते, पदाधिकारी उपस्थित होते.

व्यस्त दौऱ्यातून बजरंग सोनवणेंनी घेतला रसवंतीवर उसाच्या रसाचा आस्वाद

बीड । गेवराई

बीड लोकसभेचे राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्रजी पवार पक्ष व इंडिया आघाडीचे उमेदवार बजरंग सोनवणे व राष्ट्रवादी काँग्रेसच्या किसान सेलच्या प्रदेशाध्यक्षा पुजा मोरे यांनी प्रचाराच्या व्यस्त दौऱ्यातून वेळ काढून गेवराई ते गढी रस्त्यावरील संभाजी गोरे यांच्या रसवंतीवर थांबले. त्यांनी चरखा व उसाचा रस काढण्याची माहिती घेत शुद्ध व ताज्या उसाच्या रसाचा आस्वाद घेतला.

दरम्यान, बजरंग सोनवणे व पुजा मोरे आल्याने हरखून जात संभाजी गोरे व त्यांच्या मुलांनी त्यांचा सत्कार केला. शेतकरी व शेतमजूर यांचे कैवारी शरदचंद्रजी पवार यांच्या पक्षाचे चिन्ह तुतारीधारी माणूस या चिन्हावर मतदान करू अशी ग्वाही त्यांनी सोनवणे यांना दिली.

गहिनीनाथगड व नारायण गडाच्या धर्तीवर..! रामगडाचा विकास करणार पंकजाताई मुंडे

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्ह्याला अध्यात्मिक क्षेत्रात गडांचे वैभव लाभले. गहिनीनाथगड, नारायणगडाच्या विकासासाठी विविध योजनेतून निधी दिला. मुख्यमंत्री ग्रामसडक योजने अंतर्गत नारायण गडाला जोडणाऱ्या रस्त्यांना प्राधान्य देऊन, भाविक भक्तांना दळणवळणाची सुविधा उपलब्ध करून दिली. आज प्रथमच राम जन्मोत्सवाच्या निमित्ताने रामगडावर येण्याचे भाग्य मला मिळाले. यानिमित्ताने पंचक्रोशीतील हजारो राम भक्तांची भेट झाली. गडाचे महंत स्वामी योगीराज महाराज यांनी गडाच्या विकास कामाला चालना दिली. येथे विकास कामांची गरज आहे. गडाचे महंत आणि विश्वस्तांनी प्रस्तावित केलेला तीर्थक्षेत्र योजने अंतर्गत पंधरा कोटींचा आराखडा

मंजूर करण्यासाठी प्रयत्नशील राहील. गहिनीनाथगड व नारायणगडाच्या धर्तीवर रामगडाचाही सर्वांगीण विकास करण्याची जबाबदारी स्वीकारून निश्चितपणे विकास करू असा विश्वास पंकजाताई मुंडे यांनी रामगड येथे रामनवमी उत्सवानिमित्त उपस्थित राम भक्तांशी संवाद साधताना व्यक्त केला.

लाखो रामभक्तांचे श्रध्देय स्थान श्रीक्षेत्र रामगड येथे महंत स्वामी योगीराज महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली भगवान श्री प्रभु रामचंद्र यांच्या जन्मोत्सव निमित्त आयोजित अखंड हरिनाम सप्ताह सांगता समारंभ प्रसंगी भाजपा महायुतीचे उमेदवार मा.पंकजाताई मुंडे यांनी अध्यात्मिक सोहळ्यात सहभागी होवून भाविक भक्तांना संबोधित केले. याप्रसंगी भाजपा जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के, शिवसेनेचे कुंडलिक खांडे, दिलीपराव गोरे, गणेश पुजारी, विश्वस्त रामा बांड, सखाराम मोहीते, शिवाजी निकम आदि उपस्थित होते. पंचक्रोशीतील भाविक भक्त गण हजारोंच्या संखेने उपस्थित होते. तर महिलांची गर्दी लक्षणीय होती.

आज इंडिया आघाडीचे उमेदवार बजरंग सोनवणे यांचा गेवराई तालुका प्रचार दौरा

मतदारांच्या गाठीभेटी घेत संवाद साधणार

गेवराई । प्रतिनिधी

बीड लोकसभेचे राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे व महाविकास आघाडीचे उमेदवार बजरंग सोनवणे हे गुरुवारी (दि. १८) गेवराई तालुक्याचा प्रचार दौरा करणार असून विविध गावांना भेटी देत मतदारांशी संवाद साधणार आहेत.

बीड लोकसभेचे राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे व इंडिया आघाडीचे उमेदवार बजरंग सोनवणे हे गुरुवारी प्रचारासाठी गेवराई तालुक्याचा दौरा करणार आहेत. त्यानुसार सकाळी ८ वाजता बागपिंपळगाव, सकाळी ८.३० वाजता गोपाळ वस्ती, सकाळी ९ वाजता बेलगाव, सकाळी ९.३० वाजता रामनगर तांडा, सकाळी १० वाजता धोंडराई कॅम्प, सकाळी १०.३० वाजता धोंडराई, सकाळी ११ वाजता तळणेवाडी, सकाळी ११.३० वाजता भोजगाव, दुपारी १२

वाजता बोरीपिंपळगाव, दुपारी १२.३० वाजता उमापूर, दुपारी १.३० वाजता चकलांबा, दुपारी २.३० वाजता माटेगाव, दुपारी ३ वाजता कुंभेजळगाव, दुपारी ३.३० वाजता देवपिंप्री, दुपारी ४ वाजता भाटअंतरवली, दुपारी ४.३० वाजता राजपिंप्री, सायंकाळी ५.३० वाजता गौंडगाव, सायंकाळी ६ वाजता पांढरवाडी या गावांना भेटी देऊन मतदारांशी संवाद साधून अडीअडचणी जाणून घेत आपली भूमिका मांडणार आहेत. या दौऱ्यात राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गट, काँग्रेस, उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेनेसह इंडिया आघाडीच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी सहभागी व्हावे असे आवाहन करण्यात आले आहे.

लोकसभेसाठी मतभेद बाजूला सारून सोनवणे बंधू एकत्र

गळाभेट घेत आघाडी धर्म पाळण्याचा दिला संदेश

केज । प्रतिनिधी

तुतारीच्या सोबतीला हाताची साथ आहे. यात कोणीही शंका घेण्याची गरज नाही. असा स्पष्ट संदेश दोन दिवसांपूर्वी काँग्रेसच्या नेत्या खासदार रजनीताई पाटील व बीड लोकसभेचे महाविकास आघाडीचे उमेदवार बजरंग सोनवणे यांच्या भेटीतून जनतेत गेला आहे. तर काँग्रेसचे युवा नेते राहुल सोनवणे व बजरंग सोनवणे या दोघा सोनवणे बंधूंनी गळाभेट घेत आपल्या समर्थकांना दिलेला दिलजमाईचा संदेशही चर्चेचा विषय ठरला आहे.

केज नगरपंचायतीच्या व सारणी ग्रामपंचायतीच्या निवडणुकीत बजरंग सोनवणे व राहुल सोनवणे हे एकमेकांच्या राजकीय विरोधकांच्या भूमिकेत दिसून आले होते. या दोन्ही

निवडणुकीनंतर दोघे एकत्र आले नव्हते. मात्र राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरद पवार गटाकडून बजरंग बप्पा सोनवणे यांना उमेदवारी जाहीर झाल्यानंतर महाविकास आघाडीतील काँग्रेस आय सोबत असण्याबद्दल कोणाचेही दुमत नव्हते. परंतु काँग्रेस नेत्या खा. रजनीताई पाटील यांचे अत्यंत विश्वासू असलेले राहुल सोनवणे व बजरंग सोनवणे यांचे संबंध मागील काही निवडणुकांमधून ताणले गेले होते. त्यामुळे या लोकसभा निवडणुकीत त्यांच्या भूमिकेकडे राजकीय जाणकारांचे लक्ष होते.

दोन दिवसांपूर्वी बजरंग सोनवणे यांनी खा. रजनीताई पाटील यांची भेट घेऊन त्यांनी त्यांचे आशीर्वाद घेतले. यावेळी उपस्थित असलेले राहुल सोनवणे व भेटीसाठी आलेले बजरंग सोनवणे या दोघांनीही राजकीय परिपक्वतेचा परिचय देत कोणतीही चर्चा न करता एकमेकांची गळाभेट घेतली. या गळाभेटीतून त्यांनी आपल्या कार्यकर्त्यांना आता एकत्रित काम करायचे आहे. असा संदेश दिला आहे. एकूणच दोघांच्या एकत्रित येण्याचा फायदा महाविकास आघाडीचे उमेदवार बजरंग सोनवणे यांना होणार आहे.

खूप केले नेत्यांसाठी, यंदा लढू बाबांसाठी

नाशिकमध्ये शांतिगिरी महाराजांच्या समर्थनासाठी भक्त मैदानात

नाशिक । प्रतिनिधी

लोकसभेच्या नाशिक मतदारसंघातून महायुतीकडून इच्छुक असलेल्या शांतिगिरी महाराज यांनी आठ दिवसांचे अनुष्ठान केले होते. अनुष्ठानानंतर त्यांनी अपक्ष निवडणुकीची तयारी सुरू केली आहे. बाबांच्या भक्त परिवाराने 'खूप केलं नेत्यांसाठी यंदा लढू बाबांसाठी', 'आता लढायचं आणि जिंकायचे' असा नारा दिला. त्यामुळे नाशिकमध्ये महायुती, महाआघाडी व अपक्ष शांतिगिरी महाराज असा तिहेरी सामना रंगण्याची शक्यता आहे.

नाशिक लोकसभा मतदारसंघात महायुतीच्या उमेदवाराचा गुंता कायम असताना, युतीकडून इच्छुक असलेल्या शांतिगिरी महाराजांनी आठ

दिवसांचे अनुष्ठान केले. त्र्यंबकेश्वर येथे मंगळवारी (दि. १६) अनुष्ठानाच्या सांगतेवेळी बाबांचा भक्तपरिवार उपस्थित होता. महायुतीकडून उमेदवारीची शक्यता धूसर असताना अनुष्ठानानंतर शांतिगिरी महाराजांनी अपक्ष निवडणूक आखाड्यात उतरण्याची तयारी केली आहे. त्याचा प्रत्यय अनुष्ठान समाप्तीवेळी पाहायला मिळाली. उपस्थित भक्तांच्या हाती 'आता लढायचं आणि जिंकायचे', 'खूप केले नेत्यांसाठी, यंदा लढू बाबांसाठी' अशा आशयाचे फलक पाहायला मिळाले. देशभरात लोकसभा निवडणुका शांततेत व

यशस्वीपणे पार पडाव्यात, यासाठी महाराजांनी अनुष्ठान केल्याचे बाबाजी परिवारात बोलले जात आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केदारनाथमध्ये अनुष्ठान केले. त्यानंतर नाशिकमध्ये शांतिगिरी महाराजांनी केलेले अनुष्ठान हा चर्चेचा विषय ठरत आहे. एकप्रकारे महाराजांनी निवडणुकीचे रणशिंग फुंकल्याची चर्चा आहे. महाराज निवडणुकीत उतरल्यास नाशिकची लढत अधिक रंगतदार होऊ शकते.

उमेदवारांनीही घेतला बाबांचा आशीर्वाद

शांतिगिरी महाराजांचा नाशिक तसेच छत्रपती संभाजीनगर येथे मोठा भक्तपरिवार आहे. या परिवाराच्या बळावर २००९ साली शांतिगिरी महाराजांनी संभाजीनगरमधून निवडणूक लढविली होती. महाराजांचे मूळ गाव नाशिकमधील असल्याने त्यांचा जिल्ह्यातील दांडगा अनुभव लक्षात घेत भाजपचे उमेदवार डॉ. भारती पवार व डॉ. सुभाष भामरे तसेच राष्ट्रवादी शरद पवार गटाचे भास्कर भगरे आदींनी मध्यंतरीच्या काळात शांतिगिरी महाराजांची भेट घेत आशीर्वाद घेतले.

धनगर समाज पूर्ण ताकदीनिशी पंकजाताई मुंडेंच्या पाठिशी उभा

बीड । प्रतिनिधी

जिल्हयातील धनगर समाज पूर्णपणे भाजपा महायुतीच्या उमेदवार पंकजाताई मुंडे यांच्या पाठिमागे खंबीरपणे उभा आहे. तथापि समाजाच्या भल्यासाठी त्यांना विक्रमी मताधिक्य मिळणं आवश्यक आहे, त्यासाठी सर्वांनी कंबर कसून कामाला लागावे असे आवाहन धनगर समाज संघर्ष समितीचे अध्यक्ष माजी खासदार पद्मश्री विकास महात्मे यांनी आज विविध बैठकांमधून केले.

पंकजाताई मुंडे यांच्या प्रचारार्थ पद्मश्री विकास महात्मे यांनी आज बीड, गेवराई, माजलगाव, परळी या चार विधानसभा मतदारसंघात मॅरेथॉन बैठका घेऊन समाज बांधवांशी संवाद साधला, त्यावेळी ते बोलत होते. पुढे बोलतांना महात्मे म्हणाले, हा समाज लोकनेते मुंडे साहेबांना मानणारा

समाजाच्या भल्यासाठी पंकजाताईंना विक्रमी मताधिक्य देण्यासाठी मेहनत घ्या - महात्मे

आहे. पंकजाताईंनी धनगर समाजाच्या अडीच अडचणी सोडविण्यासाठी नेहमीच पुढाकार घेतलेला आहे. समाजाच्या पाठिमागे मी ठामपणे उभा आहे असा शब्द त्यांनी मला दिला आहे. समाजाला योग्य प्रतिनिधीत्व आणि न्याय मिळावा याकरिता त्यांची गरज आहे. पंकजाताईचा विजय तर निश्चित आहेच पण त्यांना विक्रमी मताधिक्य मिळावं यासाठी समाज बांधवांनी एकजुटीने काम करावं असं आवाहन त्यांनी केलं.

विविध ठिकाणी भेटी, बैठका

पंकजाताई मुंडे यांच्या प्रचारार्थ महात्मे यांनी गेवराईत प्रा. गणपतराव काकडे यांच्या घरी तर बीड येथे धनगर समाजाचे जागृत देवस्थान श्री खंडेश्वरी मंदिर परिसरात समाज बांधवांची बैठक घेतली. शिवसेना जिल्हाप्रमुख कुंडलिक खांडे यांच्या कार्यालयासही त्यांनी भेट दिली. शहरात त्यांनी उमेदवार स्वतः पंकजाताई यांची भेट घेतली. माजलगाव आणि परळी तालुक्यातही त्यांनी समाज बांधवांशी हितगुज साधून पंकजाताईंच्या विजयाचे आवाहन केले. या दौऱ्यात त्यांचेसमवेत युवा मोर्चाचे सचिन जायभाये, धनगर समाज संघर्ष समितीचे अनंत बनसोडे, विठ्ठलराव रबदडे, फुलचंद बोरकर, शांतीलाल पिसाळ, ॲड ईश्वर कापसे, गजानन काळे, संतराम गडदे आदींसह कार्यकर्ते मोठया संख्येने उपस्थित होते.

कोल्हापूर लोकसभा निवडणुकीतून चेतन नरके यांची माघार; कोणाला पाठिंबा देणार?

कोल्हापूर । प्रतिनिधी

लोकसभा निवडणूक लढविण्याची तयारी केली होती. अनेक पक्षाने पाठिंबा दिला होता. परंतु, शेवटच्या क्षणी अपयश आले. अशी खंत व्यक्त करत गोकुळ दूध संघाचे संचालक डॉ.चेतन नरके यांनी निवडणुकीतून माघार घेत असल्याचे बुधवारी (दि.१७) पत्रकार परिषदेत सांगितले. दरम्यान, लोकसभा निवडणुकीत कोणाला पाठिंबा देणार याबाबत अद्याप निर्णय घेतलेला नाही. कार्यकर्त्यांशी चर्चा करून निर्णय घेतला जाईल, असे नरके यांनी स्पष्ट केले.

पक्षाच्या माध्यमातून निवडणूक लढविल्यास तळागाळातील मतदारांपर्यंत पोहोचणे सोपे असते. त्यामुळे अपक्ष लढण्यापेक्षा निवडणुकीतून माघार घेत आहे. परंतु, कोल्हापूरच्या विकासासाठी पुढाकार घेणार आहे, असे नरके यांनी यावेळी सांगितले. मला कोल्हापुरातच काम करायला आवडेल, असे सांगून

तरुणांना स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करुन देण्यासाठी चेतन युवा सेतू संस्थेची स्थापना करणार आहे. त्याचबरोबर थायलंडसह आशिया खंडातील अनेक देशांसोबत साम्यंजस्य कराराच्या माध्यमातून कोल्हापुरातील फौंड्रीसह उद्योगाला चालना देण्यासाठी प्रयत्नशील राहणार असल्याचे त्यांनी सांगितले. दरम्यान, चेतन नरके कोल्हापूरमधून लोकसभा निवडणूक लढविण्यासाठी इच्छुक होते. त्या दृष्टीने त्यांनी तयारीही सुरू केली होती. शिवसेना ठाकरे गटाचे प्रमुख व माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांची त्यांनी भेटही घेतली होती.

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske, Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, कार्यकारी संपादक - अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

आपत्कालीन परिस्थितीचे नियोजन करा जिल्हाधिकारी डॉ. सुहास दिवसेंच्या सूचना

पुणे : : आपत्कालीन परिस्थितीत दुर्गम भागातील नागरिकांना आवश्यक त्या सर्व सोई-सुविधा मिळतील. तसेच त्यांची गैरसोय टाळण्याच्या दृष्टीने नियोजन करावे. सर्व संबंधित विभागाने नागरिकांना सोप्या भाषेत, पण अद्ययावत माहिती देण्याची कार्यवाही करावी, अशा सूचना जिल्हाधिकारी तथा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे अध्यक्ष डॉ. सुहास दिवसे यांनी दिल्या. जिल्हाधिकारी कार्यालय येथे जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणामार्फत आयोजित मान्सूनपूर्व आढावा बैठकीत ते बोलत होते. या वेळी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी संतोष पाटील, निवासी उपजिल्हाधिकारी ज्योती कदम, भारतीय हवामानशास्त्र विभाग पुणेचे प्रमुख कृष्णानंद होसाळीकर, शास्त्रज्ञ डॉ. मेधा खोले, एनडीआरएफचे दीपक तिवारी, सर्व उपविभागीय अधिकारी आणि तहसीलदार (दूरदृष्यप्रणालीद्वारे), तसेच सर्व संबंधित विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

डॉ. दिवसे म्हणाले, पाटबंधारे

विभागाने पूरेषा निश्चित करुन त्याची माहिती प्रशासनाला, महापालिकांना द्यावी. त्याप्रमाणे पूरेषेखाली येणार्या झोपडपट्ट्या, अतिक्रमणे काढण्याची कार्यवाही संबंधितांनी करावी. सार्वजनिक बांधकाम विभागाने धोकादायक, तसेच अतिधोकादायक ठिकाणे, गावे, पुल, रस्ते, पूरबाधित गावे आदींबाबतची माहिती सर्व संबंधित विभाग तसेच नागरिकांना माहिती द्यावी. पूरबाधित गावाच्या अनुषंगाने आपत्कालीन यंत्रणा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाने सर्व विभागांच्या समन्वयाने सज्ज ठेवावी. आरोग्य विभागाने संभाव्य आपत्कालिन परिस्थितीचा विचार करुन नागरिकांना तात्काळ सेवा मिळेल, याबाबत नियोजन करावे. तालुकानिहाय रुग्णालय, खाटा, वैद्यकीय अधिकारी, रुग्णवाहिका, रक्तपेढी, औषधे, साधनसाहित्य तयार ठेवावे.

साथीचे रोग व उपचारपद्धती आदीबाबत स्वतंत्रप्रणाली विकसित करावी. मान्सून काळात सर्पदंशाचे प्रमाण लक्षात घेऊन पुरेसा सर्पविष प्रतिबंधक लस साठा उपलब्ध ठेवावा. कृषी विभागाने खरीप हंगामात पेरणीची वेळ लक्षात घेता आवश्यक ती सर्व पूर्वतयारी करावी. पुणे महानगर व पिंपरी-चिंचवड महानगर पालिकाक्षेत्रात मेट्रो रेल्वेमार्गिकेच्या व रस्त्यांची मोठ्या प्रमाणात कामे सुरू आहेत. नदीपात्र तसेच रस्त्याच्या बाजूस मेट्रो रेल्वेमार्गिकेच्या कामांमुळे निर्माण होणारा मलबा लवकरात लवकर काढून घेण्याची मेट्राने कार्यवाही करावी. पवना नदीपात्रात असलेली अतिक्रमणे, मलबा काढण्याची तात्काळ कार्यवाही करावी. दोन्ही महानगरपालिका क्षेत्रात पावसाळ्यात कोसळणारी झाडे, मार्गिकेच्या बाजूस असणारा कचरा, झोपडपट्टीतील कचरा काढून घेण्याची कार्यवाही करावी. जुन्नर तालुक्यात बिबट्यांचा वावर लक्षात घेता सुरक्षात्मक उपाययोजना कराव्यात. भीमा नदीच्या पात्राच्या परिसरात पाण्याचा प्रवाह सुरळीत राहील याकरीता परिसरातील मलबा काढण्याची कायवाही करावी. दौंड आणि नीरा- नरसिंगपूर येथे पूरपरिस्थिती निर्माण होते.

देवरूखकर वाड्याला भीषण आग; सुदैवाने जीवित हानी नाही

पुणे । प्रतिनिधी

बुधवार पेठेतील भाऊ रंगारी गणपती मंदिर परिसरातील जुन्या लाकडी वाड्याला भीषण आग लागल्याची घटना मंगळवारी दुपारी घडली. येथील अरुंद गल्लीत आग लागल्याने परिसरात घबराट उडाली. माहिती मिळताच अग्निशमन दल घटनास्थळी दाखल झाले. जवानांनी अर्ध्या तासात आगीवर नियंत्रण मिळवले. बुधवार पेठ येथील भाऊसाहेब रंगारी गणपतीजवळ असलेल्या देवरूखकर वाड्याला मंगळवारी दुपारी १ वाजून ५५ मिनिटांनी आग लागल्याची वर्दी अग्निशमन दलाला मिळाली. त्यानंतर लगेच अग्निशमन दलाचे तीन बंब व तीन पाण्याचे टँकर दाखल झाले.

या वाड्यात कोणीही राहात नाही. मात्र, तेथे ट्रॉफी बनविण्याचे साहित्य ठेवले होते. या साहित्याने पेट घेतल्याने परिसरात मोठ्या प्रमाणात धूर पसरला होता. अग्निशमन दलाचे दहा अधिकारी आणि ४० जवानांनी आग इतरत्र पसरू नये, यासाठी सातत्याने पाण्याचा मारा केला. श्रीमंत भाऊ रंगारी गणपती मंदिराजवळ असलेल्या गल्लीत खाद्यपदार्थ, रद्दी, इलेक्ट्रॉनिक्स साहित्य विक्रीची दुकाने आहेत. येथील गल्ली अरुंद असल्याने अग्निशमन दलाची वाहने शिवाजी रस्त्यावर थांबवण्यात आली. त्यानंतर मोठ्या पाइपद्वारे आगीवर पाण्याचा मारा करण्यात आला.

या वेळी बघ्यांची मोठ्या प्रमाणावर गर्दी झाली. सुरुवातीला कसबा, नंतर मध्यवर्ती अग्निशमन केंद्र आणि त्यानंतर एरंडवणा अग्निशमन केंद्रातील वाहन आग विझविण्यासाठी घटनास्थळी दाखल झाले. अग्निशमन दलाचे प्रभारी अधिकारी कमलेश चौधरी, पंकज जगताप, संजय गायकवाड, समीर दळवी, सतीश ढमाले, सुमित खरात यांनी ही कामगिरी बजावली.

मिळकतकरासाठी तोडले पाणी

भर उन्हाळ्यात संस्थेवर कारवाई केल्याने संताप

पुणे : : मिळकतकराची सात लाखांची थकबाकी वसूल करण्यासाठी महापालिकेच्या मिळकतकर विभागाच्या अधिकार्यांनी एका संस्थेचे पाणी तोडले. विशेष म्हणजे या प्रकाराबाबत पाणीपुरवठा विभागाला कसलीही कल्पना नाही. शहरातील अनेक मोठ्या संस्थांकडे लाखो रुपयांची थकबाकी असताना केवळ एकाच संस्थेवर भर उन्हाळ्यात पाणी तोडण्याची कारवाई केल्याने संताप व्यक्त केला जात आहे. महापालिकेचे उत्पन्न वाढविण्यासाठी विविध विभागांकडून वसुली मोहिमा हाती घेतल्या जात आहेत.

२०२३-२४ हे आर्थिक वर्ष संपताना प्रशासनाने थकबाकी वसुलीवर भर दिला होता. थकबाकी न भरणार्या नागरिकांच्या व्यावसायिक मिळकती सील करणे, मिळकतीपुढे बॅन्ड वाजविणे आदी पर्याय अवलंबिले जात आहेत. नागरिकांनी कर भरला नाही, तर त्यावर दरमहा दोन टक्के व्याज आकारले जात आहे. मिळकतकराची थकबाकी वसुलीसाठी कायदेशीर मार्ग असताना मिळकतकर विभागाने भर उन्हाळ्यात गुरुवार पेठेतील एका संस्थेचे थेट पाणी तोडले आहे. दरम्यान, मिळकतकर विभागाकडून थकबाकी वसुलीसाठी नळ जोड तोडण्याची कारवाई केली असली तरी पाणी पुरवठा विभागाला याबाबत कोणतीही कल्पना नाही.

कंटेंट क्रिएटर्सनी मतदानाबाबत जनजागृती करावी : पुनीत बालन

पुणे : : मतदाराच्या एका मतात सरकार बदलण्याची किंवा स्थापन करण्याची ताकद असते. अधिकाधिक मतदारांनी या ताकदीचा वापर करावा, यासाठी कंटेंट क्रिएटर्सनी मतदानाबाबत जागृती करून देशाच्या विकासाचे भागीदार व्हावे, असे आवाहन युवा उद्योजक पुनीत बालन यांनी केले. मतदानाबाबत जनजागृती करण्याच्या उद्देशाने 'पुनीत बालन ग्रुप'च्या वतीने 'वन क्लिक वन वोट कॅन चेंज द वर्ल्ड क्रियेटर्स मिट'चे आयोजन केले होते, या वेळी ते बोलत होते. महायुतीचे उमेदवार मुरलीधर मोहोळ, लेखक दिग्दर्शक अभिनेते प्रवीण तरडे यांच्यासह मोठ्या संख्येने कंटेंट क्रिएटर उपस्थित होते.

सध्या सोशल मीडियाची ताकद प्रचंड असून, तरुणांसह सर्वच वयोगटांतील नागरिक सोशल मीडियाचा एक भाग बनले आहेत. या ताकदीचा वापर देशाच्या उज्ज्वल भविष्यासाठी करणे गरजेचे आहे. त्यासाठी सोशल मीडियातील कंटेंट क्रिएटर्सनी सक्रिय योगदान देण्याची गरज असल्याचे मत बालन यांनी व्यक्त केले. मोहोळ म्हणाले, सोशल मीडियाच्या माध्यमातून अनेक लोकांशी संवाद होतो. त्यांचे प्रश्न

जाणून घेता येतात आणि त्यावर उपाययोजनाही करता येतात. त्यामुळे सामाजिक कार्यकर्ता म्हणून अधिक प्रभावी काम करता येते. या वेळी त्यांनी मतदानाबद्दल जागृती करण्याचेही आवाहन केले.

मतदान जनजागृतीसाठी कंटेंट क्रिएटर्ससोबत सहभाग घेणार असल्याचे सांगत अभिनेते तरडे म्हणाले, चित्रपट पोहोचवण्यासाठी क्रियेटर्स यांची भूमिका सध्या अत्यंत महत्त्वाची आहे. काही सेकंदाच्या कंटेंटमध्ये लोकांच्या चेहर्यावर हास्य आणण्याचे काम अवघड असते. परंतु, कंटेंट क्रिएटर्स आपल्या प्रतिभेतून आणि निरीक्षण शक्तीद्वारे हे काम सहज करू शकतात. असेच काम त्यांनी मतदानाबाबत जागृती करण्यासाठी करावे, असे आवाहन त्यांनी केले.

'नागार्जुनकृत मूलमध्यमककारिका' ग्रंथाचा प्रकाशन सोहळा

पुणे । प्रतिनिधी

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या पाली व बौद्ध अध्ययन विभागातील संशोधक विद्यार्थी जयकर गायकवाड आणि शीतल जोरी यांच्या द्वारा अनुवादीत शून्यवादाचे जनक 'नागार्जुनकृत मूलमध्यमककारिका' ग्रंथाचा प्रकाशन सोहळा आयोजित करण्यात आला आहे. हा प्रकाशन सोहळा दि. १९ रोजी सायंकाळी ५:३० वाजता संत ज्ञानेश्वर सभागृह, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ याठिकाणी पार पडणार आहे. सदर पुस्तक प्रकाशन सोहळा डॉ. विजय खरे आणि डॉ. पराग काळकर यांच्या हस्ते संपन्न होणार आहे. तसेच या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. महेश देवकर उपस्थित असणार आहेत. या कार्यक्रमासाठी डॉ. तुकाराम रोंगटे, डॉ. प्रभाकर देसाई, डॉ. विलास आढाव, श्रीकांत बहुलकर , डॉ. प्रदीप गोखले, डॉ. अंजली कुरणे यांची प्रमुख उपस्थिती तर ग्रंथ समीक्षक म्हणून डॉ राजाभाऊ भैलुमे आणि डॉ. धनंजय लोखंडे उपस्थित असणार आहेत. या ग्रंथाचे प्रकाशन गोंदण पब्लिकेशन द्वारे केले जात आहे. या पुस्तक प्रकाशन प्रसंगी विचारांची देवाणघेवाण करण्यासाठी उपस्थित राहण्याचे आवाहन जयकर गायकवाड यांनी केले आहे.



टूलिंग एक्स्पोचे आज चिंचवडमध्ये उद्घाटन

पिंपरी (प्रतिनिधी) एनटीटीएफ ॲल्युमिनी असोसिएशन पुणे चॅप्टरच्या वतीने दि १८ आणि १९ एप्रिल २०२४ रोजी पिंपरी

चिंचवड मधील ऑटोक्लस्टर एक्झिबिशन सेंटर येथे 'टूलिंग एक्पो, पुणे २०२४' हे प्रदर्शन होणार आहे. यावेळी फोक्सवॅगन कंपनीचे उप महाव्यवस्थापक मनोज पाटील, सप्लाय चेन आणि गुणवत्ता विभागाचे वरिष्ठ महाव्यवस्थापक टाटा मोटर्सचे भट्ट हे उपस्थित राहणार आहे.

सदर प्रदर्शनाचे 'ॲल्युमिनी असोसिएशन, पुणे चॅप्टर' यांनी आयोजक आहे. या प्रदर्शनात टूलिंग संदर्भातील वेगवेगळ्या प्रोफाईल असलेल्या कंपन्या सहभागी होणार आहेत. त्यामध्ये प्रामुख्याने टूलिंग इंडस्ट्रीजला लागणारे सॉफ्टवेअर, प्रेस टूल, मोल्ड पार्ट,डाय कास्टिंग उत्पादक, कॉम्पोनंट, फिक्चर / गेज /एसपीएम उत्पादक, मशीन मॅन्युफॅक्चर आणि इन्स्पेक्शन इक्विपमेंट उत्पादक अशा ६० कंपन्या सहभागी झालेल्या आहे. या प्रदर्शनासाठी मुख्य प्रायोजक म्हणुन हस्को आणि एटीक्यू मेट्रो लाभले आहे.अशी माहिती आयोजकांनी दिली आहे.

पोलिस उपनिरीक्षकावर बलात्काराचा गुन्हा

पुणे । प्रतिनिधी

पोलिस भरतीची तयारी करणार्या तरुणीवर बलात्कार, तसेच धमकावून गर्भपात केल्याप्रकरणी शिवाजीनगर पोलिसांनी पोलिस उपनिरीक्षकाविरुद्ध गुन्हा दाखल केला. उपनिरीक्षकाने तरुणीला धमकावून जामखेड परिसरातील रुग्णालयात गर्भपात केल्याचे तरुणीने दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे. किरण माणिक महामुनी (वय ३८, रा. नागपूर) असे गुन्हा दाखल झालेल्या उपनिरीक्षकाचे नाव आहे.

याबाबत तरुणीने शिवाजीनगर पोलिस ठाण्यात फिर्याद दिली. तक्रारदार तरुणी पोलिस भरतीची तयारी करत आहे. महामुनीने तिला प्रेमाच्या जाळ्यात ओढले. तिच्यावर बलात्कार केला. तरुणी गर्भवती झाली. त्याने तिला नगर जिल्ह्यातील जामखेड परिसरात असलेल्या एका रुग्णालयात नेले. तेथे धमकावून गर्भपात केला, असे फिर्यादीत म्हटले आहे. पोलिस उपनिरीक्षक काळे तपास करत आहेत

फेसबुकवरील जाहिरातीला भुलला आणि दुचाकी खरेदी पडली महागात

पुणे । प्रतिनिधी

फेसबुकवरील जाहिरात पाहून दुचाकी खरेदी करणे एकाला चांगलेच महागात पडले आहे. सायबर चोरट्यांनी दुचाकी खरेदीचे आमिष दाखवून १ लाख ४५ हजारांना गंडा घातल्याचा प्रकार समोर आला आहे. याप्रकरणी अज्ञात चोरट्यावर सिंहगड रोड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे. फिर्यादी हे सिंहगड रस्ता परिसरात राहायला असून, त्यांनी फेसबुकवर २१ हजार रुपयांना दुचाकी विक्रीची जाहिरात पाहिली होती. त्यानुसार त्यांनी संबंधिताला गाडी विकत घेणार असल्याचे सांगितले.

त्यानंतर सायबर चोरट्याने गाडी बुकिंगसाठी २ हजार १५० रुपये ऑनलाइन स्वतःच्या बँकखात्यावर वर्ग करून घेतले. त्यानंतर काही दिवसांनी सायबर चोरट्याने तक्रारदाराला फोन करून गाडीचा गेटपास क्लिअर करण्यासाठी पाच हजार रुपये वर्ग करून घेतले. अशाच प्रकारे वेगवेगळी

कारणे सांगून चोरट्याने त्यांच्याकडून दीड लाख रुपये वर्ग करून घेत फसवणूक केली. दुचाकी न देता गंडा घातला आहे. याप्रकरणी वरिष्ठ पोलिस निरीक्षक नंदकुमार गायकवाड तपास करत आहेत.

तुम्ही जर फेसबुकवरील किंवा इतर सामाजिक माध्यमावरील जाहिरात पाहून दुचाकी किंवा चारचारी बुक करत असल्यास खबरदारी घेणे गरजेचे आहे. अन्यथा सायबर चोरट्यांकडून तुमची फसवणूक होऊ शकते. विशेषतः जाहिरातीमध्ये अतिशय कमी किमतीतील गाडी नवीन असल्याचे भासवून नागरिकांना चोरट्यांकडून भुरळ पाडली जात आहे. त्यानंतर विविध कारणे सांगून ऑनलाइन पैसे पाठविण्यास भाग पाडले जात आहे.

'एमआयटी एडीटी'च्या'कारी' महोत्सवास प्रारंभ : राजा रविवर्मा आर्ट गॅलरीत विद्यार्थ्यांच्या सर्जनशील कला सर्वांसाठी खुल्या

पुणे:एमआयटी आर्ट, डिजाईन व टेक्नॉलॉजी विद्यापीठ, पुणेच्या ललित कला, परफॉर्मिंग आर्ट्स, मीडिया, डिझाइन आणि आर्किटेक्चरचा सर्वांत मोठा महोत्सव असणाऱ्या ''कारी-२०२४'' ला घोले रोड, शिवाजीनगर येथील राजा रविवर्मा आर्ट गॅलरी येथे मंगळवारी प्रारंभ झाला.

''कारी''म्हणजे'कलाकृती', आणि चार दिवस चालणाऱ्या कला महोत्सवाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी साकारलेल्या अप्रतिम कलाकृती सर्वांना पाहण्यासाठी खुल्या असणार आहेत. विद्यार्थ्यांना प्रोत्साहन मिळावे व त्यांच्या कलाकृती लोकांपर्यंत पोचव्यात यासाठी आयोजित करण्यात आलेल्या या प्रदर्शनाचे उद्घाटनप्रसिद्ध चित्रकार चंद्रमोहन कुलकर्णी यांच्या हस्ते तर प्रसिद्ध वास्तुविशारद ऋषीकेश कुलकर्णी व गिरीश दोशी यांच्या प्रमुख उपस्थिती, विद्यार्थ्यांनी साकारलेल्या राममंदीर प्रतिकृतीचे पूजन व दीपप्रज्वलन द्वारे पार पडले. याप्रसंगी, एमआयटी एडीटी विद्यापीठाचेप्र.कुलगुरू डॉ.अनंत चक्रदेव, कुलसचिव डॉ.महेश चोपडे, डॉ.मिलिंद ढोबळे, डॉ.अश्विनी पेठे,डॉ.नचिकेत ठाकूर, डॉ.आनंद बेल्हे, डॉ.विरेंद्र शेटे, प्रा.प्रसाद निकुंभ, डॉ.तुषार पंके आदी उपस्थित होते.

उद्घाटनाप्रसंगी बोलताना, चंद्रमोहन कुलकर्णी म्हणाले की, कित्येक दिवसांपासून माझी ललित कला, परफॉर्मिंग आर्ट्स, मीडिया, डिजाइन आणि आर्किटेक्चर या सर्व गोष्टी एकाच छताखाली पाहण्याची इच्छा होती, ती आज 'कारी'च्या माध्यमातून पूर्ण होत आहे. खरंतर कला ही कुठल्याही व्यक्तिच्या जीवनातील अतिशय महत्त्वाचा असा भाग असते. कला ही मानसालाआनंदाने जीवन जगण्याची प्रेरणा देत असते. त्या

पार्श्वभूमीवरविद्यार्थ्यांच्या कलेलावाव देत, कलाभिमूख शिक्षणाकडे 'एमआयटी एडीटी'चा असणारा भर नक्कीच उल्लेखनीय आहे, असेही त्यांनी म्हटले.

या प्रसंगी बोलताना ऋषीकेश कुलकर्णी व गिरीश दोशी यांनी देखील विद्यार्थ्यांनी साकारलेल्या कलाअविष्कारांचे भरभरून कौतुक करताना, पुणे शहरातील रसिकांनी याचा लाभा घ्यावा असे आवाहन केले. तीन दिवस चालणाऱ्या 'कारी' या कला उत्सवाची सांगता शनिवार दि.२०/४/२०२४ रोजी होणार असून, तत्पूर्वी, पुणे शहरातील नागरिकांनी आपल्या कुटुंबासह या प्रदर्शनाला नक्की भेट द्यावी, असे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे.

वासुदेव कामत यांना विश्वारंभ कला पुरस्कार

'कारी-२०२४' उत्सवानिमित्त शुक्रवार दि.१९ एप्रिल २०२४ रोजी सकाळी ११वा.चित्रकलेतील बहुमुल्य योगदानाबद्दलजगविख्यात चित्रकार श्री.वासुदेव कामत यांचा प्रसिद्ध गायिका सौ.उषाताई मंगेशकर यांच्या हस्ते विश्वारंभ कला पुरस्कार देऊन गौरव करण्यात येणार आहे. या सोहळ्यासाठी माईर्स एमआयटी शिक्षण समुहाचे संस्थापक अध्यक्ष प्रा.डॉ.विश्वनाथ दा. कराड, एमआयटी एडीटी विद्यापीठाचेकुलगुरू तथा कार्याध्यक्ष प्रा.डॉ.मंगेश कराड, श्री.आदिनाथ मंगेशकर, कार्यकारी संचालकसौ.ज्योती ढाकणे आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत, अशी माहिती उद्घाटन समारंभापूर्वी झालेल्या पत्रकार परिषदेत डॉ.ढोबळे व डॉ.पेठे यांनी दिली.